



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १४६ * नांदेड * मंगळवार, दि. २ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# भाजप उमेदवार अमर राजूरकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल; राष्ट्रवादीकडून प्रवीण चिखलीकर यांचाही अर्ज

## महाविकास आघाडीतील काँग्रेसकडून रामदास पाटील, शिवसनेनेकडून कृष्णा पाटील यांचा अर्ज

## माजी आमदार जवळगावकर, 'वंचित'चे इंगोले, ज्योतिबा खराटे यांचेही अर्ज







**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची सोमवार, दि. १ जून रोजी शेवटची तारीख होती. सोमवारी भारतीय जनता पार्टीच्यावतीने उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याचबरोबर महायुतीतीलच राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रवीण पाटील चिखलीकर यांनीही अर्ज दाखल केला आहे. तसेच काँग्रेसचे रामदास पाटील सुमठाणकर, माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर (अपक्ष), शिवसेना ठाकरे गटाचे ज्योतिबा खराटे, 'वंचित'चे प्रशांत इंगोले, पंकज गायकवाड (अपक्ष) यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

दोन दिवसांपूर्वीच आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांचे पुत्र प्रवीण पाटील चिखलीकर आणि खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा पाटील आष्टीकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कुठल्याही परिस्थितीत ही निवडणूक बिनविरोध होऊ देणार नाही, असा पवित्रा काँग्रेसचे खासदार रवींद्र चव्हाण आणि शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे यांनी घेतला आहे. मात्र ४ जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची संधी असल्याने त्यानंतरच खरे चित्र स्पष्ट होणार आहे. आठ जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

नांदेड विधान परिषद निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे व त्यांच्या सहयोगी पक्षाचे मतदार मोठ्या प्रमाणात निवडून आल्यामुळे भारतीय जनता पार्टीचे पारडे जड दिसत आहे. ४५२ मतांपैकी ३०० मते मिळतील, असे दस्तुरखुद्द राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोक चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. पुढे बोलताना खा. चव्हाण म्हणाले की, सहयोगी पक्षाकडून मोठ्या प्रमाणात आम्हाला प्रतिसाद मिळाला आहे. **(पान ३ वर...)**

### नांदेड विधान परिषद निवडणुकीसाठी ८ उमेदवारांचे १७ नामनिर्देशन अर्ज दाखल

महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. २७ मे ते १ जून दरम्यान एकूण ८ उमेदवारांनी १७ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. नामनिर्देशन अर्जांची छाननी २ जून रोजी होणार असून, अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ आहे. मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होईल, तर मतमोजणी २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या निवडणुकीत नांदेड जिल्ह्यातील ४५२ पात्र मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

**दाखल झालेल्या अर्जांमध्ये :** कृष्णा नागेश पाटील (अपक्ष) -४ अर्ज, प्रविण प्रतापराव चिखलीकर (नॅशनॅलीस्ट काँग्रेस पार्टी/अपक्ष) -२ अर्ज, अमरनाथ अनंतराव राजूरकर (भाजप) -४ अर्ज, ज्योतिबा जयरामजी खराटे (अपक्ष) -३ अर्ज, पवार माधवराव निवृत्तीराव (अपक्ष) -१ अर्ज, रामदास शिवराज पाटील (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) -१ अर्ज, पंकज माणिकराव गायकवाड (अपक्ष) -१ अर्ज, प्रशांत विराज इंगोले (अपक्ष) - १ अर्ज दाखल केला आहे. भाजपचे अमरनाथ राजूरकर आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे रामदास पाटील यांनी पक्षाचा अधिकृत एए-बीबी फॉर्म सादर केला आहे.

# नांदेड विधानपरिषद निवडणुकीतून भाजपची ताकद दाखवून द्या -खा. अशोकराव चव्हाण

## हॉटेल चंद्रलोकमध्ये पार पडली पदाधिकारी आणि मतदारांची बैठक



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील आगामी विधानपरिषदेच्या सर्व १७ जागा भाजप महायुती जिंकणार, असा विश्वास व्यक्त करत या निवडणुकीच्या माध्यमातून भाजपची ताकद काय आहे? हे आपल्याला नांदेडमधून दाखवून द्यायचे आहे, असे आवाहन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केले.

भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार अमरनाथ राजूरकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सोमवार, दि. १ जून रोजी शहराच्या चंद्रलोक हॉटेलमध्ये आयोजित पक्षाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत खा. चव्हाण बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री डी. पी. सावंत, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. ॲड. श्रीजया चव्हाण, आ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, आमदार जितेश अंतापूरकर, संजय कौडगे, ॲड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, तुलजेश यादव आदी वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

भाजपने नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद मतदारसंघासाठी दोन वेळा आमदार राहिलेल्या आणि दांडगा अनुभव असलेले भाजप महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांना तिसऱ्यांदा रिंगणात उतरवले आहे.

बैठकीत मार्गदर्शन करताना खासदार अशोकराव चव्हाण यांनी अमरनाथ राजूरकर यांच्या कामाचे कौतुक केले. ते म्हणाले की, राजूरकर यांची केवळ पक्षातील पदाधिकाऱ्यांसोबतच नाही तर नगरपालिकेतील सर्व सदस्यांशी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींशी त्यांची थेट नाळ जोडलेली आहे. प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाणे आणि स्थानिक पातळीवरील अडचणींवर कशा प्रकारे मात करायची, याचे उत्तम कौशल्य राजूरकर यांच्याकडे आहे. त्यांच्या याच दांडग्या जनसंपर्काचा आणि अनुभवाचा **(पान ३ वर...)**

# नांदेड परिक्षेत्रांतर्गत पीएसआय आणि एपीआयच्या बदल्या


## शहाजी उमाप यांनी काढले आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील नांदेड पोलीस परिक्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्यांना परिक्षेत्रांतर्गत (लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली) जिल्ह्यांमध्ये बदलीचे आदेश पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी काढले. यामध्ये अनेक जणांना स्थगितीही देण्यात आली आहे.

परभणी येथील पोलीस निरीक्षक पांडुरंग गवते यांना नांदेड जिल्ह्यात तर नांदेड येथील जगन पवार, परभणी येथील दीपक लक्ष्मण आणि लातूर येथील सुधाकर बावकर या तीन पोलीस निरीक्षकांना स्थगिती मिळाली आहे.

नांदेड जिल्ह्यातून बदली झालेले अधिकारी महादेव पुरी- नांदेड ते हिंगोली, संजय निलपत्रेवार- नांदेड ते परभणी, संकेत दिघे- नांदेड ते लातूर, उमाकांत पुणे- नांदेड ते हिंगोली, हनुमंत मिटके - नांदेड ते लातूर, वसंत आरसेवार- नांदेड ते हिंगोली, कमल शिंदे- नांदेड ते परभणी, रामकृष्ण पाटील नांदेड ते लातूर, पांडुरंग माने- नांदेड ते लातूर, उमेश भोसले नांदेड ते परभणी येथे बदली झाली आहे.

परभणी जिल्ह्यातून बालाजी पुंड- परभणी **(पान ३ वर...)**




# केरळमध्ये अखेर मान्सून दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाने केली. परिणामी दक्षिण भारतातून हळूहळू वर सरकत लवकर मान्सून महाराष्ट्रासह देशाच्या इतर भागात पोहचण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे आजपासून राज्यात वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे. मात्र हा मान्सून नसून मान्सूनपूर्व पावसाच्या सरी सध्या राज्याभरात कोसळत आहे. किमान १० जून पर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही. अशीही माहिती प्रादेशिक हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दमदार पाऊस आणि अधिकृत माहिती मिळेपर्यंत शेतीतील पेरण्या न करण्याच्या सूचना कृषी विभागाकडून देण्यात आल्या आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विदर्भ, मराठवाडा, मध्यमहाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.






जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# नेपाळ : दोस्त दोस्त ना रहा!

भारत-नेपाळ संबंधांचा पाया हा केवळ राजकीय नव्हे, तर सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक विश्वासावर उभा आहे. खुली सीमा, परस्परांतील कौटुंबिक नाती, व्यापार आणि हिंदू-बौद्ध संस्कृतीचा समान वारसा यामुळे नेपाळला भारताचा सर्वात जवळचा मित्र मानले गेले. मात्र, गेल्या काही वर्षांत चीनच्या वाढत्या प्रभावामुळे नेपाळची भूमिका बदलताना दिसत आहे. आता नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी भारतावर अतिक्रमणाचा आरोप करताना, नेपाळनेही भारताच्या जमिनीवर अतिक्रमण केले आहे, असे विधान करून नव्या वादाला तोंड फोडले आहे. या विधानामुळे भारत-नेपाळ संबंधांमध्ये निर्माण होत असलेली दरी चिंतेची बाब आहे. आशिया खंडामध्ये शांतता राहण्यासाठी शेजारी राष्ट्रांसोबतचे संबंध चांगले असणे गरजेचे आहे, पण त्यालाच आता तडा जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कलापाणी, लिपुलेख आणि लिम्पियाधुरा या सीमावादाचा प्रश्न नवीन नाही. परंतु, पूर्वी हे प्रश्न शांतपणे आणि राजनैतिक पातळीवर सोडवण्याची परंपरा होती. आता मात्र नेपाळमधील काही राजकीय शक्ती भारतविरोधी भावना भडकवून अंतर्गत राजकारण साधण्याचा प्रयत्न करत आहेत. यामागे चीनचा व पाकिस्तानचा वाढता प्रभाव नाकारता येणार नाही. चीनने ज्या पद्धतीने पाकिस्तानला भारताविरोधात उभे केले, बांगलादेशात काही भारतविरोधी प्रवृत्तींना बळ दिले, त्याच धर्तीवर नेपाळलाही भारतापासून दूर नेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे चित्र दिसते. केवळ दूरच नेणे नव्हे तर भारताविरुद्ध उभं करण्याचं षडयंत्र चपट्या नाकाच्या लोकांचं चालू आहे. भारतासाठी ही बाब अधिक गंभीर आहे, कारण पाकिस्तान किंवा चीन हे पारंपरिक प्रतिस्पर्धी आहेत; परंतु नेपाळ हा विश्वासू मित्र मानला जातो. एकेकाळी हा हिंदू राष्ट्र होता, पण त्याचेही पतन झाले. अशा मित्र राष्ट्राकडून संशयाची भाषा होणे हे भारतासाठी धोक्याचे संकेत आहेत. खुल्या सीमेमुळे भारत-नेपाळ सीमेवरून मोठ्या प्रमाणात लोकांची ये-जा होते. जर या नात्यात कटुता वाढली, तर त्याचा परिणाम सुरक्षा, व्यापार आणि सामाजिक संबंधांवर होऊ शकतो. भारताच्या उत्तर सीमांवर चीन आधीच आक्रमक भूमिका घेत आहे. पाकिस्तान सातत्याने दहशतवादाचा आधार घेत आहे. बांगलादेशातही काही कट्टरवादी संघटना भारतविरोधी वातावरण निर्माण करत आहेत. अशा वेळी नेपाळसारखा पारंपरिक मित्रही दूर जाऊ लागला, तर भारतासाठी ही रणनीतिकदृष्ट्या चिंतेची बाब ठरू शकते. शस्त्रसज्जतेच्या संदर्भात विचार केल्यास भारतापुढे नेपाळचा पाच मिनिटे सुद्धा टिकाव लागणार नाही, परंतु आपल्या देशाच्या संस्कृतीनुसार आपण कोणावरही स्वतःहून आक्रमण करीत नाही. याचाच गैरफायदा सर्व राष्ट्र घेत आहेत. हे धोरणही आता बदलणे गरजेचे झाले आहे. नेपाळच्या राजकारणात चीनने मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा आणि कर्जाच्या माध्यमातून प्रभाव वाढवला आहे. चीनची योजना केवळ विकासाचा कार्यक्रम नसून, शेजारी देशांना आपल्या प्रभावक्षेत्रात आणण्याचे साधन असल्याचे अनेक उदाहरणांतून स्पष्ट झाले आहे. श्रीलंकेतील हम्बनटोटा बंदर, पाकिस्तानातील सीपीईसी प्रकल्प याचीच उदाहरणे आहेत. नेपाळमध्येही चीनचा वाढता हस्तक्षेप भारतासाठी इशारा आहे. मात्र, या परिस्थितीत केवळ नेपाळवर टीका करून चालणार नाही. भारतालाही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. अनेकदा शेजारी राष्ट्रांशी संवादात उदासीनता दिसून आली. लहान देशांच्या संवेदनशीलतेचा पुरेसा विचार झाला नाही, अशी भावना निर्माण झाली. त्यामुळे चीनसारख्या शक्तींना हस्तक्षेपाची संधी मिळाली. भारताने मोठा भाऊ ही प्रतिमा बाजूला ठेवून विश्वासू भागीदार म्हणून वागणे आवश्यक आहे. यासाठी सर्वप्रथम भारताने नेपाळसोबत सातत्यपूर्ण आणि पारदर्शक राजनैतिक संवाद वाढवला पाहिजे. सीमावाद तज्ज्ञ, इतिहासकार आणि संयुक्त सर्वेक्षणाच्या माध्यमातून शांततेने सोडवणे गरजेचे आहे. दोन्ही देशांनी भावनिक वक्तव्ये टाळून परस्पर विश्वास वाढवणारी भूमिका घ्यावी. दुसरे म्हणजे, नेपाळमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांमध्ये भारताने अधिक प्रभावी सहकार्य वाढवले पाहिजे. केवळ आर्थिक मदत नव्हे, तर लोकांमधील संबंध अधिक मजबूत करण्यावर भर द्यायला हवा. तिसरे म्हणजे, भारताने आपल्या सीमावर्ती सुरक्षेकडे अधिक गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. खुल्या सीमांचा गैरवापर दहशतवादी किंवा चीन समर्थित घटकांकडून होणार नाही, यासाठी संयुक्त सुरक्षा यंत्रणा मजबूत करावी लागेल. तसेच, सांस्कृतिक आणि धार्मिक संबंधांचा उपयोग करून जनतेच्या पातळीवर विश्वास टिकवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आज भारत एका कठीण भूराजकीय परिस्थितीत उभा आहे. चीन, पाकिस्तान आणि काही प्रमाणात बांगलादेशातून निर्माण होणारी आव्हाने आधीच गंभीर आहेत. अशा वेळी नेपाळसारखा मित्र राष्ट्रही संशयाच्या मार्गावर जाऊ लागला, तर त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. भारताने संयम, मुत्सद्देगिरी आणि दूरदृष्टी यांच्या साहाय्याने हे नाते पुन्हा विश्वासाच्या पायावर उभे करणे, हीच काळाची गरज आहे.

# अर्थव्यवस्थेच्या वेगात हरवलेली माणसं

भारतीय अर्थव्यवस्थेची झपाट्याने होत असलेली प्रगती जगाला चकित करते, आर्थिक आकडेवारी आणि विकासदर यांची वाच्यता सत्ताधीशांसाठी गौरवाचा विषय ठरते. परंतु या झगमगत्या आकड्यांच्या आड लपलेली एक कडू सत्यता दुर्लक्षित करता येणार नाही ती म्हणजे देशातील कोट्यवधी सामान्य कुटुंबांची हालअपेष्टांनी भरलेली जीवनकहाणी.




या कुटुंबांपैकी काहींची स्वप्ने मोठी असतात. त्यांना वाटते, कर्ज काढू, व्यवसाय सुरू करू, कष्ट करू, आणि एक दिवस उज्ज्वल भविष्य आपलं होईल. परंतु स्वप्नांची गाठ अनेकदा वास्तवाच्या काटेरी कुंपणाशी लागते. बाजारात स्पर्धा वाढते, महागाई गगनाला भिडते, आणि त्याच वेळी उत्पन्न मात्र खालावते. अशा स्थितीत कर्ज फेडणे तर दूरच, रोजचं जगणंही दुर्गम वाटू लागतं. काहींना वाटते की, भविष्याचा विचार करून काय उपयोग? वर्तमान जगूया. पण तेही सहज शक्य नसतं. कारण आरोग्याची आणि शिक्षणाची किंमत दिवसेंदिवस वाढते आहे. खासगी शाळा, रुग्णालये, विमा, औषधे या सर्व गोष्टी आता श्रीमंतांच्या आवाक्यात आहेत, सामान्यांच्या नव्हे, आणि म्हणूनच, थकलेल्या कर्जाचे ओझे, वाढत्या गरजा आणि अर्धवट राहिलेली स्वप्नं घेऊन कित्येक कुटुंबं उदास आणि निरुपाय होऊन बसलेली आहेत.

सार्वजनिक चिंता निर्माण करणारी घटना नुकतीच हरियाणातील पंचकुला येथे घडली. एका संपूर्ण कुटुंबाने आत्महत्या केली. त्यांच्यावर बँकेचे मोठे कर्ज होते. इतके की, ते फेडण्याची शक्यता त्यांच्या जीवनाच्या हद्दीबाहेर गेली होती. दिवसेंदिवसचे खर्च, मुलांचे शिक्षण, घरखर्च...आणि कर्जाचे हप्ते ही गणिते जेव्हा जुळेनाशी होतात, तेव्हा माणूस फारच एकटा पडतो. अशा वेळी काहीजण स्वतःशी संघर्ष करत राहतात, काहीजण मूक वेदना सहन करतात, तर काहीजण...मृत्यूला कवटाळतात.

कर्ज ही संकल्पना आपण फार वेळा घर खरेदी, वाहन खरेदी किंवा व्यवसायासाठी वापरतो, आणि हे साहजिकच आहे. कारण आर्थिक स्वावलंबनासाठी गुंतवणूक आवश्यक असते. पण जर व्यवसायासाठी घेतलेले कर्जही परतफेडीपलीकडे जाऊ लागले, तर प्रश्न उभा राहतो. देश प्रगती करतो आहे खरा, पण या प्रगतीच्या वावटळीत हे लहान व्यावसायिक, शेतकरी आणि कामगार हरवत चाललेत का? कारण शेतकरी असो किंवा लघुउद्योगी जर त्याच्या उत्पादनाचा खर्च भरूनही येत नसेल, तर दोष फक्त त्याच्या मेहनतीचा नाही. त्या मागे बाजार-व्यवस्थेतील असमतोल, नीतीधोरणांतील त्रुटी, आणि मधल्या दलालांचं वाढत चाललेलं वर्चस्व हे सगळं आहे. शेतीच्या खर्चावर अनुदान कमी होतंय, आणि बाजारात हमीभाव मिळत नाही. अशा स्थितीत हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या बातम्या आता केवळ आकडे राहिल्या आहेत, व्यथा नाही.

त्यातच लघुउद्योजक, हातावर पोट असलेले कष्टकरी, कॅब ड्रायव्हर, चहा विक्रेते हे सगळेही संघर्ष करत आहेत. महागाई वाढत असताना त्यांचं उत्पन्न स्थिर राहिलं आहे आणि बँकेचे हप्ते मात्र पगारे चढतच आहेत. या पार्श्वभूमीवर आज सरकारपातळीवर केवळ कर्जमाफी हा उपाय असू शकत नाही. गरज आहे ती दृढ धोरणांची, दूरदृष्टीची आणि संवेदनशीलतेची. केवळ आकड्यांची जंत्री वाढवून विकास घडत नाही. विकास तोच, जो शेवटच्या माणसाच्या दारापर्यंत पोहोचतो.

ही वेळ आहे प्रश्न विचारण्याची. व्यवसाय करतानाही तोट्यात का जातोय? शेती ही तोट्याचा व्यवहार का ठरते आहे? आर्थिक विकासाचा लाभ खरोखर सर्वपरी पोहोचतो आहे का? ही वेळ आहे जवाबदारीने उत्तरं शोधण्याची. कारण लाखो स्वप्नं आणि जगणं हे त्या उत्तरांवर अवलंबून आहे. देशाच्या कोट्यवधी नागरिकांच्या डोळ्यांतील आशेचा दिवा फक्त आकड्यांनी पेटत नाही तो पेटतो वास्तवाशी प्रामाणिकपणे जोडलेल्या नीतींनी, सहानुभूतीने, आणि कृतीने.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# तंबाखू मुक्त समाज : आरोग्यपूर्ण भविष्याकडे वाटचाल



दरवर्षी ३१ मे हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक तंबाखू विरोधी दिन म्हणून पाळला गेला. तंबाखूच्या सेवनामुळे होणारे गंभीर आरोग्यदोष, सामाजिक आणि आर्थिक परिणाम याबाबत जनजागृती करणे हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. सिगारेट, विडी, गुटखा आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांमुळे मानवी आरोग्यावर अत्यंत घातक परिणाम होतात आणि अनेक जीवघेणे आजार उद्भवतात. आजच्या काळात विशेषतः तरुण पिढीमध्ये तंबाखूचे व्यसन वाढताना दिसत आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. त्यामुळे तंबाखूच्या दुष्परिणामांपासून समाजाला दूर ठेवण्यासाठी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी या दिनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. तंबाखू मुक्त समाज : आरोग्यपूर्ण भविष्याकडे वाटचाल हा संदेश प्रत्येकाने आत्मसात करणे आवश्यक आहे, कारण आरोग्यदायी समाज हाच देशाच्या प्रगतीचा पाया आहे.

तंबाखू ही एक व्यसनाधीन करणारी पदार्थ आहे, जी विविध स्वरूपांमध्ये वापरली जाते. सिगारेट, विडी, गुटखा, खैनी, पानमसाला इत्यादी स्वरूपात तंबाखूचा वापर केला जातो. या सर्व प्रकारांमध्ये तंबाखू हा मुख्य घटक असून तो शरीरासाठी अत्यंत घातक मानला जातो. तंबाखूमध्ये निकोटीन नावाचे एक रासायनिक घटक असते, जे मेंदूवर परिणाम करून व्यक्तीला व्यसनाधीन बनवते. एकदा तंबाखूचे सेवन सुरू केले की त्याची सवय सोडणे खूप कठीण होते. सुरुवातीला तंबाखूचे सेवन काही लोकांना आकर्षक किंवा ताण कमी करणारे वाटते, परंतु प्रत्यक्षात ते शरीरासाठी हानिकारकच असते. तंबाखूचे नियमित सेवन केल्याने शरीरातील विविध अवयवांवर वाईट परिणाम होतो. श्वसनसंस्था, हृदय आणि तोंडाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊन अनेक आजार निर्माण होतात. त्यामुळे तंबाखू हा एक गंभीर आरोग्यधोका मानला जातो.

याशिवाय तंबाखू हे एक व्यसन असल्यामुळे व्यक्ती मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या त्यावर अवलंबून होतो. एकदा सवय लागली की ती सोडणे कठीण जाते आणि त्यामुळे व्यक्तीचे कौटुंबिक, आर्थिक आणि सामाजिक जीवन प्रभावित होते. अशा प्रकारे तंबाखूचे दुष्परिणाम अत्यंत गंभीर असून ते संपूर्ण जीवन उद्ध्वस्त करू शकतात.

तंबाखू सेवनाचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण समाजावर त्याचा गंभीर परिणाम दिसून येतो. तंबाखूच्या व्यसनामुळे कुटुंबातील आर्थिक स्थितीवर मोठा वाईट परिणाम होतो. अनेक व्यक्ती आपल्या कमाईचा मोठा भाग तंबाखूजन्य पदार्थांवर खर्च करतात, त्यामुळे घरातील मूलभूत गरजांवर परिणाम होतो आणि कुटुंब आर्थिकदृष्ट्या दुर्बल होते. धूम्रपानामुळे केवळ सेवन करणाऱ्यालाच नव्हे तर त्याच्या आसपास असणाऱ्या लोकांनाही त्रास होतो. याला सेकंड हँड स्मोक असे म्हणतात. या धुरामुळे कुटुंबातील लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि इतर सदस्य यांच्या आरोग्यावरही वाईट परिणाम होतो आणि त्यांनाही श्वसनाचे आजार होण्याचा धोका वाढतो.

तंबाखू सेवनामुळे समाजात आरोग्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणात वाढतात. रुग्णालयांवरील ताण वाढतो आणि लोकांची काम करण्याची कार्यक्षमता कमी होते. व्यसनाधीन व्यक्ती अनेकदा आपल्या कामावर लक्ष केंद्रित करू शकत नाही, त्यामुळे उत्पादनक्षमता घटते आणि समाजाच्या विकासावर परिणाम होतो.

तंबाखू मुक्त समाज निर्माण करणे ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. निरोगी आणि सक्षम समाजासाठी तंबाखूचे सेवन पूर्णपणे कमी करणे आवश्यक आहे. तंबाखूमुळे होणारे विविध आजार आणि व्यसनाधीनता टाळण्यासाठी जनजागृती करून लोकांना या सवयीपासून दूर ठेवणे गरजेचे आहे. जर समाज तंबाखूमुक्त झाला, तर लोकांचे आरोग्य अधिक चांगले राहू शकते. आरोग्यदायी जीवनशैलीमुळे देशाचा विकास अधिक वेगाने आणि प्रभावीपणे होऊ शकतो. निरोगी नागरिक हेच देशाची खरी ताकद असतात. जेव्हा लोक व्यसनमुक्त आणि आरोग्यदायी असतात, तेव्हा त्यांची कार्यक्षमता वाढते आणि ते देशाच्या प्रगतीत अधिक योगदान देऊ शकतात. तंबाखू सेवन कमी झाल्यास रुग्णालयांवरील ताण देखील मोठ्या प्रमाणात कमी होतो. कर्करोग, हृदयविकार आणि श्वसनाचे आजार यांसारख्या गंभीर आजारांचे प्रमाण घटते, ज्यामुळे आरोग्यसेवा व्यवस्थेवरचा भार कमी होतो. यामुळे लोकांचे आयुष्य अधिक दीर्घ आणि निरोगी होण्यास मदत होते. स्वच्छ आणि व्यसनमुक्त समाज हीच खरी प्रगती आहे. अशा समाजात लोक आनंदी, निरोगी आणि उत्पादक जीवन जगू शकतात. त्यामुळे तंबाखू मुक्त समाज निर्माण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे आणि त्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी शाळेतच तंबाखूपासून दूर राहण्याची शपथ घेणे ही अत्यंत प्रभावी पायरी आहे. विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत, त्यामुळे लहान वयातच योग्य सवयी लागल्या तर पुढील पिढी अधिक निरोगी आणि सक्षम बनेल. अशा प्रकारे प्रत्येकाने आपली भूमिका पार पाडल्यास तंबाखू मुक्त समाज निर्माण करणे शक्य होईल. थोडक्यात,तंबाखू हा मानवी जीवनासाठी अत्यंत घातक शत्रू आहे, जो हळूहळू शरीराचा नाश करून व्यक्तीचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो. सुरुवातीला साधी सवय वाटणारी ही गोष्ट पुढे जाऊन गंभीर व्यसन बनते आणि अनेक जीवघेण्या आजारांना आमंत्रण देते. त्यामुळे तंबाखूचे दुष्परिणाम लक्षात घेता त्यापासून दूर राहणे अत्यंत आवश्यक आहे.

आरोग्य हेच खरे धन आहे हे सत्य लक्षात घेऊन प्रत्येकाने तंबाखूपासून दूर राहावे आणि इतरांनाही याबाबत जागरूक करावे. असे केल्यास आपण एक निरोगी, आनंदी आणि तंबाखूमुक्त समाज घडवू शकतो.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

# लैंगिक कामगार : अधिकार आणि सामाजिक न्यायाचा शोध

दरवर्षी २ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून पाळला जातो. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेकदा दूर ठेवलेल्या, उपेक्षा, तिरस्कार, गैरसमज आणि भेदभावाचा सामना करणाऱ्या लाखो लैंगिक कामगारांच्या जीवनातील वास्तव, त्यांचे प्रश्न, त्यांच्या मानवी हक्कांची गरज आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पुनर्विचार करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. लैंगिक कामगारांविषयी समाजात अनेक प्रकारच्या पूर्वग्रहदूषित कल्पना प्रचलित आहेत. त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाकडे सहसा केवळ नैतिकता, परंपरा किंवा सामाजिक मूल्यांच्या चष्म्यातून पाहिले जाते. मात्र या दृष्टिकोनापलीकडे जाऊन त्यांच्याकडे एक नागरिक, एक मानव आणि मूलभूत अधिकारांचा हक्कदार म्हणून पाहणे ही काळाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन हा केवळ एका व्यवसायाशी संबंधित व्यक्तींच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचा दिवस नाही, तर मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समता, आरोग्य, सुरक्षा, लिंगन्याय आणि मानवाधिकार यांच्याशी निगडित व्यापक प्रश्नांवर चिंतन करण्याची संधी आहे.

या दिवसाचा इतिहास १९७५ सालातील एका महत्त्वपूर्ण घटनेशी जोडलेला आहे. फ्रान्समधील ल्योन शहरात त्या काळात लैंगिक कामगारांवर पोलिसांकडून सातत्याने होणारे छापे, अटकसत्रे आणि अन्यायकारक वागणूक याविरोधात मोठे आंदोलन उभे राहिले. अनेक लैंगिक कामगारांनी सेंट-निझिएर चर्चमध्ये आश्रय घेत आपल्या हक्कांसाठी आवाज उठविला. त्यांनी सुरक्षिततेची हमी, पोलिसी अत्याचारांपासून संरक्षण आणि मानवी सन्मानाची मागणी केली. या आंदोलनाने जगभरातील लैंगिक कामगारांच्या हक्क चळवळीला नवी दिशा दिली. त्यांच्या संघर्षाची आठवण म्हणून २ जून हा दिवस पुढे 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून ओळखला जाऊ लागला. आज या दिवसाचे स्वरूप जागतिक झाले असून अनेक देशांमध्ये या निमित्ताने परिसंवाद, जनजागृती कार्यक्रम, मानवी हक्क मोर्चे आणि धोरणात्मक चर्चांचे आयोजन केले जाते.

लैंगिक काम हा विषय सामाजिकदृष्ट्या संवेदनशील आणि अनेक स्तरांवर गुंतागुंतीचा आहे. विविध देश, संस्कृती, धर्म आणि सामाजिक व्यवस्थांमध्ये या विषयाकडे पाहण्याचे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. काही समाजांमध्ये लैंगिक कामाला नैतिक अधःपतनाचे प्रतीक मानले जाते, तर काही ठिकाणी ते एक प्रकारचे श्रम किंवा व्यवसाय म्हणून स्वीकारले जाते. या मतभेदांमुळे लैंगिक कामगारांच्या जीवनाविषयी वस्तुनिष्ठ चर्चा अनेकदा मागे पडते. प्रत्यक्षात लैंगिक कामगारांच्या जीवनातील प्रश्न हे त्यांच्या व्यवसायापेक्षा अधिक व्यापक आहेत. त्यामध्ये दारिद्र्य, सामाजिक विषमता, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या समस्या, हिंसा, कायदेशीर संरक्षणाचा अभाव आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या अनेक मुद्द्यांचा समावेश होतो.

भारतासह जगातील अनेक देशांमध्ये लैंगिक काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या मोठी आहे. या क्षेत्रात केवळ महिलाच नव्हे तर पुरुष, तृतीयपंथीय, ट्रान्सजेंडर आणि इतर लैंगिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तीही कार्यरत आहेत. त्यामुळे लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ महिलांच्या प्रश्नांपुरता मर्यादित राहत नाही. तो लिंगवैविध्य, सामाजिक समावेशकता आणि मानवी हक्कांच्या व्यापक चौकटीत समजून घेणे आवश्यक ठरते. विशेषतः तृतीयपंथीय समुदायाला शिक्षण, रोजगार आणि सामाजिक स्वीकार यांचा अभाव असल्याने अनेकांना लैंगिक काम हेच उपजीविकेचे साधन म्हणून स्वीकारावे लागते. या वास्तवाकडे दुर्लक्ष करून केवळ नैतिकतेच्या आधारावर निर्णय घेणे म्हणजे सामाजिक परिस्थितीचे अपूर्ण आकलन होय.

लैंगिक कामगार या क्षेत्रात कसे येतात याची कारणेही विविध स्वरूपाची असतात. काही व्यक्ती आर्थिक गरजांमुळे हा व्यवसाय स्वीकारतात. काहींना कुटुंबाचा उदरनिर्वाह



करण्यासाठी, मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी किंवा कर्ज फेडण्यासाठी हा मार्ग निवडावा लागतो. काही प्रकरणांमध्ये महिलांना फसवणूक, मानवी तस्करी, जबरदस्ती किंवा कौटुंबिक परिस्थितीमुळे या क्षेत्रात ढकलले जाते. काही व्यक्ती मात्र स्वतःच्या निर्णयाने हा व्यवसाय स्वीकारतात. त्यामुळे सर्व लैंगिक कामगारांच्या परिस्थितीला एकाच चौकटीत बसविणे योग्य नाही. त्यांच्या जीवनातील विविधता आणि अनुभवांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

मानवी तस्करी आणि लैंगिक काम या दोन भिन्न बाबी आहेत, हे स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. अनेकदा या दोन्ही गोष्टींची गल्लत केली जाते. मानवी तस्करी म्हणजे व्यक्तींना फसवून, धमकावून किंवा जबरदस्तीने शोषणासाठी वापरण्याची गुन्हेगारी प्रक्रिया होय. दुसरीकडे, काही व्यक्ती स्वतःच्या इच्छेने लैंगिक काम करतात. त्यामुळे मानवी तस्करीविरोधी उपाययोजना करताना स्वेच्छेने काम करणाऱ्या व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. तस्करीविरोधी लढा आणि लैंगिक कामगारांच्या मानवी हक्कांचे संरक्षण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत.

जगभरातील विविध देशांमध्ये लैंगिक कामाबाबत वेगवेगळे कायदे आहेत. काही देशांमध्ये हा व्यवसाय पूर्णपणे कायदेशीर आहे आणि त्यावर विशिष्ट नियम लागू आहेत. काही देशांमध्ये अंशतः मान्यता आहे, तर काही ठिकाणी तो पूर्णपणे बेकायदेशीर आहे. प्रत्येक व्यवस्थेचे फायदे आणि मर्यादा आहेत. कायदेशीर मान्यता असलेल्या देशांमध्ये आरोग्य, सुरक्षा आणि कामगार हक्कांच्या दृष्टीने काही संरक्षण उपलब्ध असते. तथापि, केवळ कायदेशीर मान्यता दिल्याने सर्व समस्या सुटतात असे नाही. सामाजिक कलंक आणि भेदभाव यांवरही तितक्याच गांभीर्याने काम करणे आवश्यक असते.

कोविड-१९ महामारीच्या काळात लैंगिक कामगारांच्या असुरक्षिततेचे वास्तव अधिक ठळकपणे समोर आले. लॉकडाऊनमुळे त्यांचे उत्पन्न अचानक बंद झाले. अनेकांकडे बचत नव्हती, सामाजिक सुरक्षा नव्हती आणि पर्यायी रोजगाराच्या संधीही नव्हत्या. परिणामी, हजारो कुटुंबांना अन्न, औषधे आणि निवाऱ्याच्या समस्या निर्माण झाल्या. या काळात अनेक स्वयंसेवी संस्थांनी मदतीचा हात पुढे केला. या अनुभवाने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा यंत्रणा किती महत्त्वाची आहे हे अधोरेखित केले.

आर्थिक सक्षमीकरण हा लैंगिक कामगारांच्या जीवनातील बदलाचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. अनेक व्यक्तींना पर्यायी रोजगाराच्या संधी, कौशल्य प्रशिक्षण, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि आर्थिक साक्षरता कार्यक्रमांचा लाभ मिळाल्यास त्यांचे जीवन अधिक स्थिर होऊ शकते. काही व्यक्तींना हा व्यवसाय सोडून इतर क्षेत्रांत काम करायचे असते, परंतु शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना संधी मिळत नाही. त्यामुळे शासनाने आणि सामाजिक संस्थांनी पुनर्वसन व कौशल्य विकासाच्या योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध मानवी हक्क संघटना आणि जागतिक संस्था लैंगिक कामगारांच्या हक्कांसाठी कार्य करीत आहेत. त्यांचा भर आरोग्यसेवा, कायदेशीर संरक्षण, हिंसाचारापासून सुरक्षा आणि सामाजिक समावेशन यांवर असतो. या प्रयत्नांमुळे अनेक देशांमध्ये धोरणात्मक चर्चा सुरू झाल्या आहेत. तथापि, अजूनही अनेक समाजांमध्ये या विषयाविषयी खुलेपणाने चर्चा करण्यास संकोच वाटतो. त्यामुळे जनजागृती आणि संवादाची प्रक्रिया अधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे.

आजच्या काळात विकासाची संकल्पना केवळ आर्थिक वृद्धीपुरती मर्यादित राहिलेली नाही. विकास म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे. समाजातील कोणताही घटक उपेक्षित राहू नये, हीच खरी लोकशाही आहे. लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ एका समुदायाचा प्रश्न नसून मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समावेशन आणि न्याय यांची परीक्षा आहे. या समुदायाकडे पूर्वग्रहांच्या चष्म्यातून नव्हे, तर मानवतेच्या दृष्टीने पाहिले गेले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिनाचे खरे महत्त्व याच ठिकाणी आहे. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की मानवी हक्क सार्वत्रिक असतात आणि ते कोणत्याही व्यवसाय, जात, धर्म, लिंग किंवा सामाजिक स्थितीवर अवलंबून नसतात. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षितता, आरोग्य, शिक्षण, न्याय आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. या मूल्यांचा आदर करणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि सुसंस्कृत समाज ठरतो. त्यामुळे २ जूनचा हा दिवस केवळ स्मरणदिन म्हणून नव्हे, तर सामाजिक संवेदनशीलता, मानवी प्रतिष्ठा आणि न्यायपूर्ण समाजनिर्मितीच्या संकल्पनेला बळ देणारा दिवस म्हणून साजरा केला जाणे आवश्यक आहे. अशा समताधिष्ठित, मानवतावादी आणि न्यायप्रिय समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने आपल्या पातळीवर प्रयत्न करणे, हीच या दिवसाला खरी मानवंदना ठरेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# जिल्ह्यात स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिमेला सुरुवात

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त १ ते ५ जून या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिमेला ग्रामीण भागात उत्साहात प्रारंभ झाला आहे. मोहिमेच्या पहिल्या दिवशी ग्रामपंचायत स्तरावर घनकचरा व्यवस्थापनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

या मोहिमेंतर्गत २ जून रोजी पूर्व मोहीम कालावधीत उभारण्यात आलेल्या सामुदायिक कचरा व्यवस्थापन मालमत्तांच्या पाहणीसाठी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, स्वच्छता समन्वयक, पाणी व स्वच्छता समिती सदस्य तसेच स्थानिक नागरीक यांच्या संयुक्त प्रकल्प भेटी आयोजित करण्यात येणार आहेत. यावेळी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत उभारलेल्या मालमत्तांची माहिती व त्यांचे ब्रँडिंग याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच माझे गाव, माझी जबाबदारी या संकल्पनेअंतर्गत गावातील कचरा व्यवस्थापनासाठी स्थानिक स्तरावर नियोजन करण्यात येणार आहे.

बुधवार, दि. ३ जून रोजी गावामध्ये मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या घटकांची ओळख पटवून त्यांची यादी तयार करण्यात येणार असून, भविष्यातील कचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक नियोजन केले जाणार आहे. गुरुवार, दि. ४ जून रोजी स्वच्छता जनजागृती, वृक्षारोपण आणि परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील दृश्यमान स्वच्छता, सार्वजनिक घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन सुविधांची देखभाल-दुरुस्ती यामध्ये नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व पटवून दिले जाणार आहे. तसेच एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण मोहीमही राबविण्यात येणार आहे.

दि. ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार असून, या ग्रामसभांमध्ये मोहिमेअंतर्गत झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात येईल. तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६, मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, कचऱ्याचे स्त्रोतांवर चार प्रकारांमध्ये वर्गीकरण, कंपोस्टिंग, कचरा वाहतूक व्यवस्था, जुने कचरा साठे ओळखणे आणि नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये ग्रामपंचायत व नागरिकांची भूमिका याबाबत सविस्तर चर्चा व जनजागृती करण्यात येणार आहे.

स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी ग्रामपंचायती, ग्रामस्तरीय समित्या व नागरिकांनी मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे. तेसच विधान परिषद निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने सर्व उपक्रम राबविताना लागू असलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचनाही संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

# २ कोटी १५ लाखांचा मुद्देमाल जप्त; १० जणांवर गुन्हा दाखल

## गंगाबेट वाळू घाटावर नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई



**नांदेड(प्रतिनिधी)**–गोदावरी नदी पात्रातील अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्या माफियांविरोधात नांदेड ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली. 'ऑपरेशन क्रॅक डाऊन' अंतर्गत गंगाबेट शिवारातील गोदावरी नदी पात्रात टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी तब्बल २ कोटी १५ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अवैध गौण खनिज उपसा करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिले होते. त्या अनुषंगाने नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण यांच्या पथकाला गंगाबेट शिवारातील गोदावरी पात्रात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे स्वतः पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी आपल्या सहकारी पोलिसांना सोबत घेऊन ३१ मे रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास नदी पात्रात छापा टाकला.

या कारवाईत पोलिसांनी दोन हायवा (एमएच २६-सीएच ९४ ००) आणि एमएच१४-८८४९), ट्रॅक्टर व ट्रॉली, दोन मोठ्या लोखंडी बोटी, फायबर बोट, सक्शन पंप, वाळू उपसा करणारे ११ इंजिन, पात्रात आणि वाहनांमध्ये असलेली एकूण १०४ ब्रास वाळू असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलीस अंमलदार हनुमंत तेलंग यांच्या फिर्यादीवरून बालाजी अशोक सांगळे रा. बामणी, बळीराम गोवर्धन चव्हाण रा. लिंबोटी तांडा, अशोक मोरे रा. सोनखेड, अतुल प्रभाकर गच्चे रा. जवळा आणि इतर ६ अनोळखी अशा एकूण १० आरोपींविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पथकाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलिस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांनी कौतुक केले.

# महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याचा मसुदा रद्द करण्याची मागणी



**किनवट (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ मधील 'अबोलिशन-रीग्रँट' मसुद्याचा तातडीने पुनर्विचार करून तो पूर्णतः रद्द करावा, अशी मागणी किनवट शहरातील विविध मंदिरांच्या विश्वस्त समिती आणि विश्व हिंदू परिषदेतर्फे सहायक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला यांच्याकडे सोमवार दि.१ जून रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, प्रस्तावित कायद्यामुळे देवस्थानांच्या इनामी जमिनींचे महसूल जमिनीत रूपांतर होऊन धार्मिक संस्थांची स्वायत्तता धोक्यात येईल. मंदिरं व मठांच्या मालमत्तेवरील शासकीय नियंत्रण वाढेल, तसेच शतकानुशतके चालत आलेल्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक व्यवस्थेवर विपरीत परिणाम होईल, असा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. देवस्थानांच्या जमिनी या केवळ मालमत्ता नसून त्या नित्यपूजा, उत्सव, जत्रा, अंगभोग-रंगभोग, धार्मिक सेवा आणि विविध सेवाधारी वर्गाच्या उपजीविकेचा आधार आहेत. प्रस्तावित कायद्यामुळे या जमिनींचे स्वरूप बदलून त्यांचे व्यापारीकरण होण्याची शक्यता असून, मंदिरांच्या आर्थिक स्वायत्ततेवरही गदा येऊ शकते. तसेच देवस्थानांना स्वतंत्र विधिक अस्तित्वाऐवजी केवळ संस्था म्हणून मर्यादित केल्यास त्यांच्या पारंपरिक अधिकारांचे अवमूल्यन होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# रुग्ण व नातेवाईकांसाठी वॉटर फिल्टर विथ कुलर भेट; कासिम वसीमबाबू आणि हॅपी क्लबचा पुढाकार



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी येथे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना स्वच्छ व आरोग्यदायी पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने वॉटर फिल्टर विथ कुलर भेट देण्यात आले आहे.

भीषण उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुग्ण व नातेवाईकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन हॅपी क्लब व नांदेड शांतता कमिटीच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. ॲड. मोहम्मद कासिम वसीम बाबुसेठ तसेच हॅपी क्लबचे अध्यक्ष मोहम्मद शोहेब यांच्या सहकार्याने बालरोग विभागातील वॉर्ड क्रमांक ७ साठी हा वॉटर फिल्टर विथ कुलर रुग्णालयास प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, बालरोग विभागप्रमुख डॉ. किशोर राठोड, उपवैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवानंद देवसरकर, अधिसेविका बी. आर. मुदीराज यांच्यासह कर्मचारी व रुग्ण, नातेवाईक उपस्थित होते.

यावेळी अधिष्ठाता डॉ. देशमुख यांनी समाजातील दाते, सामाजिक संस्था आणि सुजाण नागरिकांनी सामाजिक दायित्वाच्या भावनेतून रुग्णालयाला रुग्णोपयोगी साहित्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना थेट लाभ मिळत असून, अधिकाधिक दाते पुढे येऊन आरोग्यसेवेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

देण्यात आलेल्या साहित्याची योग्य देखभाल व व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही संबंधित वॉर्डाला देण्यात आल्या. तसेच रुग्ण व नातेवाईकांनी उपलब्ध सुविधांचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमासाठी रुग्णालय प्रशासनाच्या वतीने राजरत्न केळकर व कुणाल महागडे (समाजसेवा अधीक्षक) यांनी संस्थेशी समन्वय साधून अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली वॉटर फिल्टर उपलब्ध करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले. रुग्णालय प्रशासनाने दात्यांचे आभार मानून भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# नांदेड जिल्हा १५ वर्षांखालील बॉक्सिंग संघ निवड चाचणी



**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन (कंपनी अधिनियमाच्या कलम ८ अंतर्गत नोंदणीकृत) यू १५ वर्षे सबजुनियर व कब क्लास यू ११ वयोगटातील मुले व मुली महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धा १० ते १५ जून २०२६ जळगाव येथे होणार आहेत. या स्पर्धेसाठी खेळाडूंची वयोमर्यादा सब ज्युनिअर यू १५ साठी १ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१३ व यू ११ कब क्लाससाठी १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१७ या दरम्यान जन्मलेले खेळाडू पात्र राहतील.

या स्पर्धेसाठी खालील वजन गट राहतील. यू ११ वजन गट मुले व मुली : जास्तीत जास्त १० बॉक्सरचा संघ पुढील वजन गटात सहभागी होऊ शकतो. १५ वजन गट मुले व मुली : जास्तीत जास्त १५ बॉक्सरचा संघ पुढील वजन गटात सहभागी होऊ शकतो

३०-३३ कि.ग्रॅ. ३३-३५ कि.ग्रॅ., ३५-३७ कि.ग्रॅ. ३७-४० कि.ग्रॅ., ४०-४३ कि.ग्रॅ., ४३-४६ कि.ग्रॅ., ४६-४९ कि.ग्रॅ., ४९-५२ कि.ग्रॅ., ५२-५५ कि.ग्रॅ., ५५-५८ कि.ग्रॅ. ५८-६१कि.ग्रॅ., ६१-६४ कि.ग्रॅ., ६४-६७कि.ग्रॅ., ६७-७० कि.ग्रॅ. +७० कि.ग्रॅ.)

या सर्व वजन गटांमध्ये बॉक्सर आपली नोंदणी करू शकतात तरी या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी नांदेड संघ जिल्हा निवड चाचणीचे सिडको तालुका क्रिडा संकुल येथे आयोजन ३ जुन २०२६ बुधवार सकाळी ९ वाजता करण्यात आले आहे व सहभाग नोंदवणाऱ्या खेळाडूंनी २ तारखेला संध्याकाळी ८ वाजेपर्यंत खालील नंबर वर नाव नोंदणी करून घ्यावे (८१८०९०६५८९).

खेळाडूंसाठी सोबत जन्माचा दाखला, वैद्यकीय प्रमाणपत्र (Age Veryficastion, HIV Test), पासपोर्ट साईज २ फोटो ही कागदपत्रे सोबत आणायचे आहे. या निवड चाचणीसाठी जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन बॉक्सिंग असोसिएशन नांदेडचे जिल्हा अध्यक्ष अक्षय बनसोडे व महासचिव नागराज चावरे यांनी केले आहे.

# महापालिकेत अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील महानगरपालिकेतर्फे रविवार, दि. ३१ मे रोजी सकाळी ११ वाजता स्थायी सभागृहात अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या मराठा साम्राज्यातील माळवा प्रांताच्या अत्यंत कर्तबगार, दानशूर आणि न्यायप्रिय राणी होत्या. प्रजाहितदक्षता आणि उत्कृष्ट प्रशासनासाठी त्यांना 'लोकमाता' म्हणून ओळखले जात. याप्रसंगी क्षेत्रिय अधिकारी गौतम कवडे, महापौर यांचे स्विय सहायक साईराज मुदिराज, वरिष्ठ लिपीक शुभांगी चौधरी, सुजात अली यांच्यासह मनपाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'स्वारातीम' विद्यापीठात तीन कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दीर्घकाळ समर्पित सेवा बजावून सेवानिवृत्त होत असलेल्या तीन कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सेवापूर्ती गौरव सोहळा अधिसभा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यापीठाच्या वतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सपत्नीक शाल, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र तसेच साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे होते. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम व नवसंशोधन मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यापीठातील विविध विभागांत उल्लेखनीय सेवा बजावलेल्या श्याम भरतराव डाकोरे (लेखाधिकारी), श्यामराव शेषराव हंबर्डे (सेवक) आणि आसाराम बापूराव काटकर (सफाईदार) यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

लेखाधिकारी श्याम भरतराव डाकोरे यांनी विद्यापीठात सुमारे ३० वर्षे सेवा बजावत संपदा विभाग, लेखा विभाग, भंडार विभाग आणि प्रकाशन विभागात कार्य केले.

श्यामराव शेषराव हंबर्डे यांनी १९९६ पासून सेवक पदावर कार्यरत राहून संपदा विभाग, विद्यार्थी विकास विभाग, प्रकाशन विभाग आणि परीक्षा विभागात आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. तर आसाराम बापूराव काटकर यांनी सफाईदार पदावर कार्यरत राहून पात्रता विभाग, स्थावर विभाग, कुलगुरू निवासस्थान, शैक्षणिक विभाग, माध्यमशास्त्र संकुल तसेच श्री गुरु गोविंदसिंघजी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र येथे सेवा बजावली.

अध्यक्षीय समारोपात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करताना, विद्यापीठ हे केवळ संस्था नसून एक कुटुंब आहे. या कुटुंबातील सदस्यांच्या प्रदीर्घ आणि निष्ठावंत सेवेचा गौरव करणे ही विद्यापीठाची समृद्ध परंपरा आहे, असे प्रतिपादन केले.

सत्काराला उत्तर देताना लेखाधिकारी श्याम डाकोरे यांनी गेल्या तीन दशकांतील सहकार्याबद्दल विद्यापीठ प्रशासन, अधिकारी, सहकारी कर्मचारी यांचे आभार व्यक्त केले. यावेळी उपस्थित सहकाऱ्यांनीही निवृत्त कर्मचाऱ्यांविषयीच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी केले. या सोहळ्यास विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, मान्यवर तसेच सत्कारमूर्तींचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बालाजी कदम यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – लोहा तालुक्यातील वाळकी (खुर्द) येथील बालाजी तुळशीराम कदम (वय ८० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने सोमवार, दि. १ जून रोजी सायंकाळी ५ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. २ रोजी दुपारी १ वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

**पान १ वरून...**

**भाजप उमेदवार अमर राजूरकर...**

वरिष्ठ पातळीवरून नांदेडची जागा ही भारतीय जनता पार्टीसाठी सोडण्यात आली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी, शिवसेना हे दोन्ही पक्ष आमच्यासोबत आहेत. तसेच अदृश्य हातांचीही आम्हाला मदत मिळण्याची शक्यता असल्याचे खासदार अशोक चव्हाण यांनी सांगितले. एमआयएम संदर्भात त्यांच्या नेत्यांशी बोलून राजूरकर निर्णय घेतील, असेही ते म्हणाले.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे चिरंजीव प्रवीण पाटील यांनी उमेदवारी दाखल केली असली तरी ४ तारेखपर्यंत ते निश्चितच मागे घेतील, याची आम्हाला खात्री आहे. कारण सर्व पक्षाच्या नेत्यांनीच हा निर्णय घेतला असल्यामुळे अंतर्गत बंडाळी होणार नाही. नांदेड येथील निवडणूक बिनविरोध झाली तर चांगलीच आहे. परंतु महाआघाडीचा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्यामुळे बिनविरोध होणार नाही, हे निश्चित आहे. नांदेड विधान परिषदेवर भाजपचा झेंडा निश्चितच फडकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी भाजपचे अधिकृत उमेदवार अमरनाथ राजूरकर म्हणाले की, पक्षाने माझ्यावर विश्वास टाकला आहे. मी पूर्णतः सर्व नगरपालिका, नगरपरिषद आणि महापालिकेतील नगरसेवकांशी वैयक्तिक चर्चा केली असून, आमचे मित्र पक्ष राष्ट्रवादी-शिवसेना यांच्या नगरसेवकांनी मला पूर्णपणे पाठिंबा दिला आहे. बिलोली-धर्माबाद येथील मराठवाडा विकास आघाडीच्या नगरसेवकांनीदेखील आम्हाला पाठिंबा दिल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे ४५२ पैकी ३०० मते माझ्या पारड्यात पडतील, यावर माझा विश्वास आहे. पक्षाच्या चिन्हावर ही निवडणूक नसल्यामुळे आम्ही एमआयएमशीदेखील बातचित करणार आहोत. तिसऱ्यांदा मी विधानपरिषदेवर निवडून जाईन, याची मला खात्री आहे, असेही ते शेवटी म्हणाले.

यावेळी खासदार रवींद्र चव्हाण म्हणाले की, ही निवडणूक बिनविरोध होऊ देणार नाही. यासाठी काँग्रेसच्याही दोन उमेदवारांनी आज अर्ज दाखल केले आहेत. ज्यात माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर आणि देगलूरचे रामदास पाटील सुमठाणकर यांनी उमेदवारी दाखल केली आहे. पक्षाने आदेश दिल्यानंतर एक उमेदवारी अर्ज मागे घेऊ आणि एक उमेदवार निवडणूक रिंगणात उभा करून त्यांना निवडून आणू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सोबतच शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख बबन बारसे यांनी आपल्याही पक्षाचे उमेदवार म्हणून ज्योतिबा खराटे यांचा अर्ज दाखल केला आहे. चार तारखेपर्यंत पक्षाच्या नेत्यांनी आदेश दिल्यास त्यानंतर निर्णय घेऊ असे बबन बारसे यांनी सांगितले.

-----------------------

**नांदेड विधानपरिषद निवडणुकीतून...**

फायदा पक्षाला नक्की होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अमरनाथ राजूरकर यांच्याकडे असलेल्या नेतृत्व कौशल्याच्या जोरावर ही निवडणूक आपल्याला एकतर्फी जिंकायची आहे, असा विश्वास चव्हाण यांनी व्यक्त केला. पक्षाच्या सर्व लोकप्रतिनिधींनी, पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन राजूरकर यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावयाचे असल्याचेही खा. अशोक चव्हाण यांनी सांगितले आहे.

या बैठकीला भाजपचे प्रमुख नेते, जिल्ह्यातील आमदार, माजी आमदार, नगरसेवक आणि मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीनंतर अत्यंत उत्साही वातावरणात अमरनाथ राजूरकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.

-------------------

**नांदेड परिक्षेत्रांतर्गत पीएसआय...**

ते नांदेड, मारुती कदम परभणी ते लातूर, सुनील अंधारे- परभणी ते लातूर, राम गिते- परभणी ते नांदेड, संजय चव्हाण - परभणी ते नांदेड, संदीप आनंदराव - परभणी ते हिंगोली.

परभणी येथे बदली बालाजी किरवले, परमेश्वर चव्हाण, जसपालसिंग कोटतिर्थवाले, रमेश गायकवाड, शिवराज नरवाडे यांना पाठविण्यात आले आहे. तर स्थानिक गुन्हे शाखेचे मिलिंद सोनकांबळे आणि महेश कोरे यांना लातूर जिल्ह्यात पाठविण्यात आले आहे.

हिंगोली जिल्ह्यात आशिष बोराटे, बाबुराव चव्हाण, तसेच परभणी जिल्ह्यातून बदली झालेले अधिकारीः शिवकांत नागरगोजे यांची लातूरहून नांदेड. हिंगोली येथे बदली संदीप गडदे, अमोल गंगलवाड, कार्तिकेयेश्वर तुरनर. नांदेड येथे बदलीहून आलेल्यांमध्ये रविंद्र तारु, मुरारी गायकवाड, प्रशांतसिंह राजपूत, तानाजी पाटील, भगवान मोरे यांचा समावेश आहे. परभणी येथे बदली गोपाळ शिंदे, नागनाथ मुंडे. नांदेड येथे बदली शिवाजी बोडले, सतीश टेंगे यांना पाठविण्यात आले आहे. परभणी येथे बदलीः युवराज दत्तराव गवळी.

लातूर जिल्ह्यातून भाऊसाहेब खंदारे - लातूर ते परभणी, भीमराव गायकवाड - लातूर ते नांदेड, ज्ञानदेव सानप- लातूर ते परभणी, विठ्ठल दुरपडे लातूर ते नांदेड. या अधिकाऱ्यांच्या बदलीला १ वर्षाची स्थगिती मिळाली आहे-दत्तात्रय मंटाळे (नांदेड), सुभाष माने (नांदेड), रेखा काळे (नांदेड), मंगेश नाईक (नांदेड), मेधा निंबाळकर (लातूर).

# मुदखेड काँग्रेस कमिटी कार्यालय येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



**मुदखेड (प्रतिनिधी)**– मुदखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने रविवार, दि. ३१ मे रोजी शहर काँग्रेस कमिटी कार्यालय ठाकरे चौक मुदखेड येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी माजी नगरसेवक गोविंद गोपनपल्ले यांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच त्यांच्या समाजहितकारी कार्याचा व आदर्श शासनकारभाराचा या वेळी गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

या कार्यक्रमास माजी नगरसेवक गोविंद गोपणपल्ले, माजी नगरसेवक गंगाधर डांगे, गटनेता प्रतिनिधी तथा शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गिरीश कोत्तावार, सुभाष चौदंते, शहर युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष वेदांत शेवटे, विठ्ठल आचार्य, सामाजिक कार्यकर्ते रमेश बोडके, शेख गौस भाई फुलवाले, मोहनभाई फुलवाले, गंगाधर पाटील मगरे आणि शेख अनिस भाई नायगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपस्थित मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श समाजाने घ्यावा, असे आवाहन केले. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

CMYK

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती...

# शिवार

**उडीद, मूग, भुईमूग या पिकांची पेरणी ३० जूनपर्यंत होणे आवश्यक आहे. उशिरात उशिरा ७ जुलैपर्यंत या पिकांची पेरणी करता येते. त्यापेक्षा उशीर झाल्यास या पिकांच्या उत्पादनात घट येते. ७ जुलैनंतर मूग, उडीद, भुईमूग या पिकांची पेरणी करू नये.**

१ मॉन्सून ३० जूनपर्यंत किंवा ७ जुलैपर्यंत आला नाही म्हणजे पावसात एक आठवड्याने उशीर झाल्यास मात्र काही पिकांमध्ये बदल करावे लागतील. उदा. ८ जुलैपर्यंत पाऊस लांबला तर मूग, उडीद, भुईमुगाऐवजी कापूस, सोयाबीन, तूर, संकरित बाजरी, तीळ, सूर्यफूल, संकरित ज्वारी या पिकांना प्राधान्य द्यावे.

२ पावसाचे आगमन ८ ते १५ जुलैदरम्यान झाल्यास कापूस, सोयाबीन, तूर, संकरित बाजरी, तीळ, सूर्यफूल, संकरित ज्वारी ही पिके घ्यावीत. मूग, उडीद, भुईमूग ही पिके घेऊ नयेत.

३ पावसाचे आगमन १६ जुलै ते ३१ जुलैदरम्यान झाल्यास संकरित ज्वारी, भुईमूग, कापूस या पिकांऐवजी संकरित बाजरी, सूर्यफूल, तूर, एरंडी या पिकांबरोबरच सोयाबीन + तूर (४:२), बाजरी + तूर (३:३), एरंडी + धने, एरंडी + तूर या आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.

४ पावसाचे आगमन १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान झाल्यास संकरित ज्वारी, भुईमूग, सोयाबीन व कापूस या पिकांऐवजी संकरित बाजरी, सूर्यफूल, तूर, एरंडी, तीळ या पिकाबरोबरच एरंडी + धने (१:१), एरंडी + तूर या आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा लागेल.

५ पावसाचे आगमन १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान झाल्यास संकरित ज्वारी, भुईमूग, सोयाबीन व कपाशी, रागी, तीळ या पिकांऐवजी संकरित बाजरी, सूर्यफूल, तूर या पिकांबरोबरच एरंडी + धने (१:१), एरंडी + तूर या आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा लागेल.


६ सोयाबीन आणि कापूस या महत्त्वाच्या पिकांची लागवड इतर पर्याय उपलब्ध नसल्यास उशिरात उशिरा ३१ जुलैपर्यंत करावी, त्यानंतर लागवड करू नये.

## पेरणीचे नियोजन

**पेरणीयोग्य पाऊस झाल्यानंतर (७५ ते १०० मिलिमीटर) प्रत्येक पिकासाठी दिलेल्या कालावधीनुसार लागवड करावी. सर्वसाधारण परिस्थिती तसेच उशिरा पेरणीसाठी आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी.**

- कापसाची पेरणी खोल आणि मध्यम खोल काळ्या जमिनीत करावी. हलक्या जमिनीत लागवड करू नये.
- कापूस + तूर (१०:२ किंवा ६:१) आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.
- सोयाबीन + तूर (४:२) या आंतर पीक पद्धतीचा अवलंब करावा.
- सोयाबीन लागवड रुंद वरंबा सरी पद्धतीने करावी.
- तुरीच्या शिफारसीत जातींची निवड करून योग्य अंतरावर लागवड करावी.
- मध्यम ते भारी जमिनीत कापसासोबत तूर, खरीप ज्वारी आणि सोयाबीनसारखी पिके घ्यावीत.
- हमखास पावसाच्या क्षेत्रात मध्यम ते भारी जमिनीकरिता दुबार पीक पद्धतीचा अवलंब करावा. (मूग, रब्बी ज्वारी, संकरित ज्वारी-करडई/हरभरा, सोयाबीन- हरभरा)
- मध्यम जमिनीत सूर्यफूल, तूर, बाजरी, सोयाबीन, ज्वारी यांसारखी पिके घ्यावीत.
- हलक्या जमिनीत बाजरी, तीळ, कारळा, एरंडी यांसारखी पिके घ्यावीत.
- कापसामध्ये तूर (६:१ किंवा १०:२), सोयाबीन (१:१), मूग (१:१) किंवा उडीद (१:१) याप्रमाणे आंतरपीक घ्यावीत.
- कापसामध्ये तूर (६:१ किंवा १०:२), सोयाबीन (१:१), मूग (१:१) किंवा उडीद (१:१) याप्रमाणे आंतरपीक घ्यावीत.
- तूर पिकामध्ये भारी जमीन व एक ते दोन सिंचन असल्यास बीएसएमआर ७३६, गोदावरी, बीएसएमआर ८५३, बीडीएन ७१६ या जातींची निवड करावी. बीडीएन ७११ ही जात कमी कालावधीची आहे. या जातीचा वापर कोरडवाहू क्षेत्रासाठी करावा.
- जमिनीची मशागत आणि पेरणी उताराला आडवी करावी जेणेकरून पावसाचे अधिकाधिक पाणी जमिनीत मुरेल. त्याचा पिकांना लाभ होईल.
- प्रमाणित बियाण्यांचा वापर करावा. सोयाबीनचे घरचे बियाणे वापरावे. पेरणी केलेल्या प्रमाणित बियाण्यापासून तयार होणारे बियाणे दोन ते तीन वर्षे पेरणीसाठी वापरता येते परंतु यासाठी घरच्या घरी उगवणक्षमता तपासावी (कमीत कमी ७० टक्के असावी).
- पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया (थायरम २.५ ग्रॅम किंवा थायरम २ ग्रॅम अधिक कार्बेन्डाझिम २ ग्रॅम त्यानंतर स्फुरद विरघळणारे जिवाणू संवर्धक २५ ग्रॅम, रायझोबियम जिवाणू संवर्धक २५ ग्रॅम, ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम) करूनच पेरणी करावी.
- प्रत्येक पिकाच्या पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. शिफारशीत अंतरावर लागवड करावी.
- पेरणी करताना योग्य अंतर आणि खोलीवर पेरणी करावी (उदा. सोयाबीन ५ ते ६ सेंमीपेक्षा जास्त खोलीवर पेरणी करू नये). हेक्टरी योग्य बियाणे पेरणीसाठी वापरावे. हेक्टरी योग्य रोपांची संख्या ठेवावी.
- वेळेवर आंतरमशागत करून तण नियंत्रण करावे. जेणेकरून अन्नद्रव्ये, जमिनीतील ओलावा, जागा, सूर्यप्रकाश यासाठी पिकांना तणाकडून स्पर्धा होणार नाही.
- एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन करावे. रासायनिक खतांच्या शिफारस मात्रेसोबतच शिफारस केलेली सेंद्रिय खतांची मात्रा द्यावी किंवा ५० ते ७५ टक्के रासायनिक खतासोबत २५ ते ५० टक्के सेंद्रिय खतांचा वापर करावा. यामुळे सेंद्रिय कर्ब वाढेल. यातून जमिनीचे रासायनिक, भौतिक व जैविक गुणधर्म योग्य राहून पीक उत्पादनात वाढ होईल. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढेल, मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा समतोल व उपलब्धता वाढेल, जमिनीचे तापमान राखण्यास मदत होईल, जिवाणूंची संख्या वाढेल.
- एकात्मिक कीड, रोग व्यवस्थापनाचा अवलंब करावा. यामुळे खर्चात बचत होईल, दुसरीकडे रासायनिक कीटकनाशकांच्या संतुलीत वापरामुळे कीड, रोगांची प्रतिकार क्षमता वाढणार नाही. सापळा पिके, जैविक कीटकनाशके, आंतर पीक पद्धती, पक्षिथांबे यांचा वापर करावा.






# आंतरपीक पद्धतीवर भर द्या...

## पीक नियोजन करताना...



- गेल्या काही वर्षांत असे दिसून येत आहे, की मॉन्सून बऱ्याच वेळा उशिरा सुरू होऊन त्याचे उशिरा निर्गमन होत आहे. अशावेळी काही पिकांच्या उत्पादनात घट येत असली तरी उपलब्ध पिकांपैकी सर्वोत्तम पर्याय म्हणून काही पिकांची लागवड पाऊस उशिरा सुरू झाला तरी करता येऊ शकते.
- सर्वसाधारणपणे १५ जुलैपर्यंत सर्व पिकांची पेरणी करता येते. केवळ मूग, उडीद व भुईमूग पिकांची पेरणी ७ जुलैपर्यंत करावी. परंतु पाऊस उशिरा सुरू झाल्यास मूग, उडीद व भुईमूग या पिकांची पेरणी १५ जुलैपर्यंत करता येते. मात्र उशिरा पेरणीमुळे उत्पादन होणारी घट आणि काढणीच्या वेळी पीक पावसात सापडण्याची शक्यता लक्षात घेणे गरजेचे आहे.
- एकूणच पाऊस उशिरा सुरू होत असून, उशिरा संपत असल्यामुळे सोयाबीन, कापूस लागवड २२ जुलैपर्यंत करता येईल. आंतरपीक पद्धतीमध्ये सोयाबीन लागवड ३० जुलैपर्यंत करावी. उदा. सोयाबीन + तूर (४:२) ही आंतरपीक पद्धती योग्य आहे.

### आंतरपीक पद्धतीचा अवलंब

आंतरपीक पद्धतीमुळे वेळेवर पेरणी व उशिरा पेरणी अशा दोन्ही परिस्थितींत शाश्वत उत्पादन व अधिक आर्थिक उत्पन्नाबरोबरच मृद् व जल संवर्धन होण्यास मदत होते. उशिरा पावसात एक पीक हाताचे गेले किंवा एका पिकास बाजारभाव कमी मिळाल्यास दुसरे पीक ही जोखीम कमी करते. कापूस + मूग/ उडीद /सोयाबीन (१:१), ज्वारी अधिक तूर (४:२), सोयाबीन अधिक तूर (४:२), बाजरी अधिक तूर (३:३) असे पीक नियोजन करावे.

### जलसंधारण सरी

मशागतीची कामे पूर्ण झाल्यानंतर पेरणीपूर्वी उताराला आडवी खोल सरी काढल्यास जलसंधारणासाठी उपयुक्त ठरते. बैलाच्या सरीच्या नांगराने अथवा कोळप्याने उतारानुसार ५ ते १० मीटर अंतरावर ४५ ते ६० सेंमी आणि ३० सेंमी खोल सरी काढावी. सरीला ०.२ ते ०.४ टक्का उतार दिल्यास अतिरिक्त पाणी शेताबाहेर जाते.

### जलसंवर्धन चर

काळ्या खोल व भारी जमिनीमध्ये समपातळी किंवा ढाळीच्या बांधास काटछेदाचे चर घेऊन त्यातील माती काठावर टाकून बांध तयार करावा. चर सलग न ठेवता, ठराविक अंतरावर खोदलेला भाग राखण्यात येतो. या चरामध्ये साठवलेले पाणी गरजेच्या काळात संरक्षित सिंचनाकरीता उपयोगात येते.

### बंदिस्त वाफे अन् बंदिस्त बांध

अल्प उतार तसेच छोट्या आकाराच्या क्षेत्रात परीघावर बांध टाकून मूलस्थानी जलसंधारण करता येते. यासाठी १ मीटर उंचीपर्यंतचा बांध आणि आपत्कालीन परिस्थितीत अतिरिक्त पाण्याच्या निचऱ्याकरिता सांडव्याची व्यवस्था करावी.

### शेततळी, पाण्याचा पुनर्वापर

बऱ्याच वेळा मृद् व जलसंधारणाच्या विविध उपायांचा अवलंब करूनही जमिनीत न मुरलेले पावसाचे अतिरिक्त पाणी पृष्ठभागावरून वाहून जाते. हे पाणी शेताच्या खोलगट भागात शेततळ्याद्वारे साठवून संरक्षित सिंचनाकरिता उपयोगात आणता येते. तुरीमध्ये १ ते २ संरक्षित सिंचनामुळे उत्पादनात ३० ते ४० टक्के वाढ होते.

### फवारणीद्वारे अन्नद्रव्यांचा वापर

पाण्याचा ताण सहन करण्याच्या दृष्टीने पोटॅशिअम नायट्रेटची (१३:००:४५) साधारणपणे १ ते १.५ टक्का (१०० ते १५० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) फवारणी करावी.

### आच्छादनाचा वापर

सुरुवातीस पावसाच्या आगमनानंतर एक ते दोन खंड जुलै, ऑगस्ट महिन्यात दिसतात. अशावेळी जमिनीतील ओलावा कमी होऊन पिकांना पाण्याचा ताण बसतो. जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा. (उदा. सुबाभूळ, गिरिपुष्पाचा पाला, गव्हाचा भुसा, मातीची भर इत्यादी) आधुनिक सिंचन पद्धती उदा. पिकानुसार ठिबक सिंचन, तुषार सिंचनाचा अवलंब करावा.



## उभ्या पिकांत ठरावीक अंतरानंतर सरी

खरीप पिकांच्या पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी आंतरमशागतीची सुरुवातीस कामे पूर्ण झाल्यानंतर बळीराम किंवा लाकडी नांगराने पिकांच्या ओळीमध्ये (ठरावीक अंतरावर किंवा ठरावीक ओळीनंतर) उदा. कापूस, तूर या सारख्या जास्त अंतरावरील पिकामध्ये प्रत्येक एक ते दोन ओळींनंतर आणि तूर, ज्वारी, बाजरी, मूग, उडीद, सोयाबीनसारख्या कमी अंतरावरील पिकामध्ये प्रत्येक ४ ते ६ ओळींनंतर सऱ्या काढाव्यात. १५ ते २० सेंमी खोलीच्या अरुंद सऱ्या पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे संधारण होण्यास तसेच अतिरिक्त झालेल्या पाण्याचा निचरा होण्यासही मदत होते.

## सरी वरंबा आणि बंदीस्त सरीचा उपयोग

हलक्या, मध्यम उताराच्या जमिनीवर ही पद्धत उपयुक्त ठरते. बळीराम किंवा सरीचा नांगर किंवा कोळप्याच्या साह्याने पेरणीपूर्वी पिकानुसार ५० ते ६० सेंमी अंतरावर सरी वरंबा तयार करून वरंब्यावर लागवड करता येते. कोरडवाहू शेतीमध्ये आंतर मशागतीची सुरुवातीची कामे झाल्यानंतर सरी वरंबे तयार करून उताराच्या जमिनीमध्ये सरीच्या लांबीवर ५ ते ७ मीटर अंतरावर सऱ्यांमध्ये आडवे वरंबे तयार केल्यास सरीमध्ये जमा झालेले पाणी उताराच्या दिशेने न वाहता जमिनीत तेथेच मुरण्यास मदत होते.

## रुंद वरंबा सरी पद्धत

ही पद्धत भारी जमिनीमध्ये जलसंधारण तसेच अतिरिक्त पाण्याच्या निचऱ्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. जास्त अंतरावरील पिकाच्या एक ते दोन ओळी, तर कमी अंतरावरील पिकाच्या ३ ते ४ ओळी वरंब्यावर घेता येतात. उदा. सोयाबीन पिकाच्या ३ ते ४ ओळी घेता येतात. केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्थेने विकसित केलेल्या बीबीएफ यंत्राचा किंवा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या बीबीएफ यंत्राचा पेरणीसाठी उपयोग करावा. याद्वारे वरंबे तयार करणे, पेरणी करणे, खते देणे अशी कामे एकाच वेळी करता येतात. याद्वारे बियाणे, खतामध्ये बचत होते, उत्पादनात वाढ होते.

# आंतरपीक पद्धतीतून वाढवा उत्पन्न

**आंतरपीक पद्धतीमुळे जमिनीची सुपीकता वाढते. मशागतीचा खर्च कमी होतो. जमिनीची धूप कमी होते. जिरायती लागवड क्षेत्रात आंतरपीक पद्धतीचा अवलंब करून प्रतिएकरी अधिक उत्पादन, आणि आर्थिक फायदा मिळविणे शक्य आहे. जिरायती शेती आर्थिकदृष्ट्या फायदेशीर बनविण्यासाठी आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. रब्बी हंगामासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने जमीन व पावसाचे प्रमाण यानुसार विविध आंतरपीक पद्धतीची शिफारस केली आहे.**

आंतरपीक पद्धतीत कडधान्य पिके निवडावीत. उदा. हरभरा हे आंतरपीक म्हणून निवडल्यास या पिकांच्या मुळावरील गाठीमध्ये असणारे जीवाणू वातावरणातील नत्र जमिनीतून पिकांसाठी उपलब्ध करुन देतात. यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. कडधान्य वर्गातील पिकांमुळे जमिनीची जैविक, भौतिक व रासायनिक सुपिकता टिकवून ठेवण्यास मदत होते. आंतरपीक पद्धतीमुळे बदलत्या हवामानामुळे होणाऱ्या विपरीत परिणामांची तीव्रता कमी करून विविध नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर करून उत्पादनात स्थिरता मिळते. तसेच लागवड केलेल्या पिकांपैकी एका तरी पिकास चांगला दर मिळून आर्थिक फायदा होतो. जमिनीचा प्रकार आणि वार्षिक पाऊसमान लक्षात घेऊन आंतरपीक पद्धतीची निवड करावी. मध्यम व खात्रीच्या पावसाच्या भागात व भारी जमीनीत व जेथे जलधारणा शक्ती आहे अशा ठिकाणी रब्बी ज्वारी, करडई, हरभरा ही पिके घ्यावीत. मध्यम जमिनीत सूर्यफूल, करडई या पिकांची लागवड करावी. मध्यम खोल व ओलावा टिकवून ठेवणाऱ्या जमिनीत रब्बी ज्वारी, करडई, हरभरा तसेच रब्बी ज्वारी+करडई (६:३), करडई+हरभरा (६:३) या आंतरपीक पद्धतीने लागवड करावी. लागवडीसाठी शिफारस केलेल्या जातींची निवड करावी. प्रतिहेक्टरी बियाणांचे योग्य प्रमाण ठेवावे. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. दोन ओळीमध्ये योग्य अंतर ठेवून हेक्टरी रोपांची योग्य संख्या ठेवावी. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे. वेळेवर आंतरमशागत करावी. हलकी कोळपणी करुन भेगा बुजवाव्यात. जेणे करून ओलावा टिकवून ठेवता येईल.



### ✓हरभरा+करडई आंतरपीक पद्धती : (६:३,४:२,३:१,२:१)

- हरभरा+करडई पीक निव्वळ किंवा आंतरपीक पद्धतीत घेता येते. पावसावर अवलंबून असणाऱ्या भागात हरभरा+करडई (४:२, ३:१ किंवा २:१) या प्रमाणात आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.
- हरभरा+करडई ही एक चांगली आंतरपीक पद्धती आहे. एक तेलबिया पीक व एक कडधान्य वर्गातील पीक यात समाविष्ट आहे.
- यामध्ये हरभरा+करडई ६:३ याप्रमाणेही लागवड करता येते. यामध्ये हरभरा पिकाची उत्पादन क्षमता तसेच चांगला दर यामुळे शाश्वत उत्पादन आणि चांगला आर्थिक फायदा होतो.
- करडई+हरभरा : (६:३, ३:३, २:४) करडईचे क्षेत्र अधिक असलेल्या ठिकाणी करडई+हरभरा ही आंतरपीक पद्धती ६:३ किंवा ३:३ किंवा २:४ ओळींच्या प्रमाणात घेता येते. ही पद्धत मध्यम ते भारी जमिनीसाठी योग्य आहे.
- जवस आणि हरभरा किंवा करडई आंतरपीक पद्धती : यामध्ये जवस+हरभरा (४:२), जवस+करडई (४:२) किंवा (३:१), जवस+मोहरी (५:१) या प्रमाणात घेता येते. यामध्ये मध्यम किंवा मध्यम ते भारी या आंतरपीक पद्धतीची निवड करावी.

### ✓रब्बी ज्वारी+करडई : (६:३)

- या आंतरपीक पद्धतीमध्ये रब्बी ज्वारी+करडई (६:३) या प्रमाणे आंतरपिकांची पेरणी करावी. रब्बी ज्वारीचे मुख्य उत्पादन (धान्य) व कडबा उत्पादन यामुळे तसेच याची उत्पादनक्षमता, गरज व दरामुळे ओळींची संख्या अधिक आहे. यामध्ये करडई पिकाचा फायदा असा होतो की, थंडी जास्त पडल्यास ज्वारीचे उत्पादन कमी झाल्यास थंडीमध्ये करडईची वाढ चांगली होऊन चांगले उत्पादन मिळते. ज्वारीच्या कमी उत्पादनामुळे होणारे नुकसान भरून निघते.

### ✓रब्बी ज्वारी+हरभरा : (६:३) किंवा (३:६), (२:४)

- यामध्ये रब्बी ज्वारीची उत्पादनक्षमता व जेथे जनावरे आहेत तेथे कडब्याची गरज म्हणून रब्बी ज्वारीच्या ओळी जास्त ठेवल्या आहेत. परंतु, जेथे कडब्याची गरज नाही आणि हरभऱ्यास चांगला बाजारभाव आणि चांगले उत्पादन देणाऱ्या जाती असल्यामुळे हरभरा+रब्बी ज्वारी ६:३ किंवा ४:२ याप्रमाणे लागवड करता येऊ शकते. हरभरा पीक थंडीमध्ये चांगले उत्पादन देते. अशा वेळी थंडीमध्ये ज्वारीवर विपरीत परिणाम झाला तर हरभरा पिकाच्या उत्पादनातून ते नुकसान भरून निघू शकते. बागायती आंतरपीक पद्धती : १) गहू+हरभरा (६:३) मध्यम ते भारी जमिनीमध्ये गहू+हरभरा ६:३ ओळींच्या प्रमाणात ही आंतरपीक पद्धती घेतली जाते. २) गहू+मोहरी (६:३) : मध्यम ते भारी जमिनीमध्ये गहू+मोहरी आंतरपीक पद्धतीमध्ये ६:३ याप्रमाणे लागवड करावी.

# महायुतीचं टेन्शन वाढलं, तब्बल ८ जागांवर बंडखोरीचा धोका



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात सध्या विधानपरिषद निवडणुकीची धूम आहे. अनेक नेत्यांनी आपल्या पक्षाचा आदेश झुगारून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. महायुतीत बंडखोरीचे प्रमाण जास्त असल्याने आता या बंडखोरांना उमेदवारी अर्ज मागे घ्यायला लावण्यासाठी तसेच त्यांची मनधरणी करण्यासाठी प्रयत्न करावा लागणार आहे. छत्रपती संभाजनगर, रायगड या मतदारसंघांतही अशीच स्थिती आहे. दरम्यान, राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये कोणकोणत्या जागांसाठी बंडखोरी झालेली आहे.

१) रायगडमध्ये राष्ट्रवादीकडून अनिकेत तटकरेंना उमेदवारी, महेंद्र दळवींची मुलगी जुईली दळवींची बंडखोरी २) संभाजीनगर-जालना-भाजपकडून सुहास शिरसाठ यांना उमेदवारी, आ. अब्दुल सत्तार यांचे पुत्र समिर सत्तारांची बंडखोरी ३) यवतमाळ-शिवसेनेकडून दुष्यंत चतुर्वेदींना उमेदवारी, तर भाजपचे नितीन भुतडा, राष्ट्रवादीकडून साजिद बेग यांची बंडखोरी ४) पुण्यात राष्ट्रवादीकडून विक्रम काकडेंना उमेदवारी, भाजपचे प्रदीप कंद यांच्याकडून बंडखोरी ५) अमरावतीत भाजपकडून प्रवीण पोटेंना उमेदवारी, शिवसेनेचे विप्लव बाजोरीयांची बंडखोरी ६) नाशिक -शिवसेनेकडून नरेंद्र दराडेंना उमेदवारी, अपक्ष गोकूळ गिते,गणेश गितेंचा अर्ज, महाजनांचे निकटवर्तीय ७) परभणी-शिवसेनेकडून सईदा खान यांना उमेदवारी, राष्ट्रवादीकडून विजय जामकर आणि जिल्हा परिषद सदस्य संग्राम जामकरांची बंडखोरी ८) नांदेड-भाजपकडून अमरनाथ राजूरकरांना उमेदवारी, राष्ट्रवादीचे प्रवीण पाटील चिखलीकरांची बंडखोरी (आमदार चिखलीकरांचा मुलगा) ९) जळगाव-भाजपकडून नंदकिशोर महाजनांना उमेदारी, तर शिवसेनेचे रेश्मा काळे, दीपक धांडेची बंडखोरी.

**महाविकास आघाडीत बंडखोरी**

१) नांदेड-रामदास सुमठाणकर काँग्रेसकडून मैदानात, माधवगाव जवळकरांची बंडखोरी, नागेश अष्टीकरांचा मुलगा कृष्णा आष्टीकरांची ठाकरे गटाकडून बंडखोरी २) भंडारा गोंदिया-काँग्रेसकडून प्रफुल्ल अग्रवाल यांना उमेदवारी, तर नरेश ईश्वरकर आणि दिलीप बनसोड यांचा अर्ज, उमेदवारी वरुन संभ्रामावस्था ३) सांगली-शरद पवार गटाकडून बाळासाहेब पाटलांचा अर्ज तर काँग्रेस संजय मेंढे आणि मयूर पाटीलांचा अर्ज ४) सोलापूर-काँग्रेसकडून आदित्य फत्तेपूरकरांना उमेदवारी, शरद पवार गटाकडून वसंत नाना देशमुख आणि शिवसेना ठाकरे गटाकडून नागेश अक्कलकोटेंची बंडखोरी. दरम्यान, महायुतीमध्ये अनेक ठिकाणी बंडखोरी झालेली असली तरी बंडखोरांना त्यांचे उमेदवारी अर्ज मागे घेण्यास सांगितले जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे. अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ही ४ जून आहे. तोपर्यंत आम्ही सर्वांशी चर्चा करू आणि योग्य तोडगा काढू, असे शिंदे म्हणाले. तसेच आम्ही ही निवडणूक एकदिलानेच लढवू, असेही शिंदे यांनी सांगितले आहे.

## अब्दुल सत्तारांच्या मुलाची बंडखोरी

राज्यातील विधानपरिषद निवडणुकीच्या अर्ज भरण्याच्या अखेरच्या तासात छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून एक अत्यंत खळबळजनक आणि मोठी राजकीय बातमी समोर आली आहे. महायुतीच्या जागावाटपात ही जागा भाजपला सुटलेली असताना आणि भाजपने अधिकृत उमेदवार घोषित केलेला असतानाही, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे महायुतीत शिवसेनेकडून बंडखोरी होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# महायुती विरूद्ध महाविकास आघाडी; विधान परिषदेच्या १७ जागांसाठी लढत



**मुंबई (प्रतिनिधी)** –राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी अखेर सोमवारी उमेदवारी अर्ज भरण्यात आले असून महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच थेट लढत होणार आहे. मात्र, जवळपास सर्वच मतदारसंघात काही नेत्यांनी नाराजी व्यक्त करत बंडखोरी केलीय, तर काहींनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने एकाच जागेसाठी अनेक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र, प्रमुख लढत ही महायुतीचे उमेदवार विरुद्ध महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्यातच होणार आहे. सोलापूर ते संभाजीनगर आणि जळगाव ते नागपूरपर्यंत एकूण १७ मतदारसंघातील उमेदवारांची नावे आता समोर आली असून कोणत्या मतदारसंघात कोण प्रमुख उमेदवार आहेत, याची माहिती खाली देण्यात आली आहे.

महायुतीमध्ये भाजप ११ जागांवर निवडणूक लढवत असून शिंदेंची शिवसेना ४ जागांवर मैदानात आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसला जागावाटपात २ जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीचा विचार केल्यास, काँग्रेस सर्वाधिक ८ जागांवर निवडणूक लढवत आहे, ठाकरेंची शिवसेना ६ जागांवर उमेदवार देत असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीने तीन मतदारसंघात उमेदवार दिले आहेत. त्यामुळे, या सर्व जागांवरील प्रमुख लढती आता निश्चित झाल्या असल्या तरी खरे चित्र ४ जून रोजीच स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, सोलापूर, अहिल्यानगर ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड,परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि नागपूर (पोटनिवडणूक) राज्यातील १७ मतदारसंघातील प्रमुख लढती, आमन-सामने कोण? १. सोलापूर : काँग्रेस मविआचे आदित्य फत्तेपूरकर विरुद्ध भाजप महायुतीचे राजेंद्र राऊत २. अहिल्यानगर – काँग्रेस मविआचे करण ससाणे विरुद्ध भाजप महायुतीचे प्राजक्त तनपुरे ३. ठाणे : राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे अभिजीत पवार विरुद्ध शिवसेना महायुतीचे रविंद्र फाटक ४. जळगाव : शिवसेना ठाकरे मविआचे शरद तायडे विरुद्ध भाजप महायुतीचे नंदकिशोर महाजन ५. सांगली-सातारा : राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे बाळासाहेब पाटील/ अभयसिंह जगताप विरुद्ध भाजप धैर्यशील माने ६. नांदेड : काँग्रेस मविआचे रामदास पाटील विरुद्ध भाजप महायुतीचे अमर राजूरकर ७. यवतमाळ : काँग्रेस मविआचे साहेबराव कांबळे विरुद्ध शिवसेना महायुतीचे दुष्यंत चतुर्वेदी ८. पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे श्रीकांत पाटील विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे विक्रम काकडे ९. भंडारा-गोंदिया : काँग्रेस मविआचे दिलीप बनसोड विरुद्ध भाजप महायुतीचे अविनाश ब्राह्मणकर १०. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग – शिवसेना ठाकरे गट विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अनिकेत तटकरे ११. नाशिक : मविआचा उमेदवार नाही, अपक्ष विरुद्ध शिवसेना महायुतीचे नरेंद्र दराडे १२. वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली : काँग्रेस मविआचे शैलेश अग्रवाल विरुद्ध भाजप महायुतीचे अरुण लखानी १३. अमरावती : काँग्रेस मविआचे हर्षदीप देशमुख विरुद्ध भाजप महायुतीचे प्रवीण पोटे १४. धाराशिव-लातूर-बीड : काँग्रेस मविआचेचे महेश देशमुख विरुद्ध भाजप महायुतीचे बसवराज पाटील १५. परभणी-हिंगोली : शिवसेना मविआचे डॉ. विवेक नावंदर विरुद्ध शिवसेना महायुतीच सईद खान १६. छत्रपती संभाजीनगर-जालना – शिवसेना ठाकरे गट विरुद्ध भाजप किंवा शिवसेना १७. नागपूर (पोटनिवडणूक) : काँग्रेस मविआचे अतुल लोंढे विरुद्ध भाजप महायुतीचे डॉ. राजीव पोतदार.

# एकनाथ शिंदेंचे पुन्हा ‘धक्कातंत्र’, अल्पसंख्याक चेहऱ्याला परभणी विधान परिषदेची उमेदवारी

**परभणी (प्रतिनिधी)** – परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा ‘धक्कातंत्र’ वापरले आहे. राजकीय वर्तुळातील सर्व अंदाज बाजूला सारत, उपमुख्यमंत्र्यांनी अल्पसंख्याक समाजातील तरुण चेहरा सईद खान यांना उमेदवारी जाहीर केली आहे. सईद खान हे सध्या शिवसेनेच्या अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष असून ते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कोअर टीमचे अत्यंत विश्वासू सदस्य मानले जातात.

सईद खान यांच्या उमेदवारीमुळे मराठवाड्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलण्याची शक्यता आहे. शिवसेनेच्या पारंपरिक मतदारांसोबतच अल्पसंख्याक समाजाला महायुतीकडे खेचण्यासाठी उपमुख्यमंत्री शिंदेंनी टाकलेला हा पत्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी टाकलेली ही राजकीय खेळी चर्चेचा विषय ठरत आहे.

सईद खान हे गेल्या १५ वर्षांपासून एकनाथ शिंदे यांचे अत्यंत कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. ९ जुलै २०२३ रोजी त्यांच्याकडे शिवसेना अल्पसंख्याक आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. त्यानंतर त्यांनी मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात विविध सामाजिक आणि राजकीय उपक्रम राबवून पक्ष मजबूत केला. त्यांच्या नेतृत्वात राज्यातील विविध नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांमधील सुमारे ९०० अल्पसंख्याक लोकप्रतिनिधींनी शिवसेनेत प्रवेश केला होता.

# महिन्याच्या पहिल्याच दिवशी सिलिंडरच्या किंमतीत वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)** – जून महिन्याच्या पहिल्याच दिवशी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत तब्बल ४२ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीमुळे आता व्यावसायिक वापरकर्त्यांना अधिक खिसा रिकामा करावा लागणार आहे.

सर्वसामान्य जनता आधीच पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या वाढत्या दरांमुळे त्रस्त असताना, आता महिन्याच्या पहिल्याच दिवशी महागाईचा आणखी एक मोठा झटका बसला. तेल कंपन्यांनी एलपीजी सिलिंडरच्या दरांमध्ये वाढ करण्याची घोषणा केली. जून महिन्याच्या पहिल्याच दिवशी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत तब्बल ४२ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीमुळे आता व्यावसायिक वापरकर्त्यांना अधिक खिसा रिकामा करावा लागणार आहे. यासोबतच, ५ किलोग्रॅमच्या फ्री ट्रेड एलपीजी सिलिंडरच्या किमतीतही ११ रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

# कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके भारतात येणार

## राजधानीतील जंतर-मंतरवर आंदोलन करणार






**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके ६ जून रोजी भारतात परतणार आहेत. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन करणार आहेत. अभिजीतने ‘एक्स’ अकाउंटवर ‘कॉकरोच इज बॅक’ ही माहिती दिली. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अलीकडील ‘कॉकरोच’ वक्तव्यानंतर ‘कॉकरोच जनता पार्टी’ हे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म उदयास आले. सीजेपीचे इन्स्टाग्रामवर २० दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत.

३० वर्षीय अभिजीत दीपके छत्रपती संभाजी नगरमधील असून डिजिटल मीडिया स्ट्रॅटेजिस्ट आहे. वृत्तानुसार, अभिजीतने पुण्यात पत्रकारितेचे शिक्षण घेतले असून, सध्या तो अमेरिकेतील बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये पब्लिक रिलेशन्समध्ये पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत आहेत. अभिजीतने २०२० ते २०२२ या काळात केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीसाठी सोशल मीडिया स्ट्रॅटेजिस्ट म्हणून काम केले. २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीदरम्यान, अभिजीतने ‘आप’साठी व्हायरल मीम-आधारित ऑनलाइन प्रचार साहित्य तयार केले होते. एका मुलाखतीत अभिजीतने खुलासा केला की, त्याने वैयक्तिक आयुष्य आणि आर्थिक स्थैर्यासाठी ‘आप’ सोडले आणि बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये अर्ज केला. प्रवेश मिळाल्यानंतर तो अमेरिकेत स्थायिक झाला. अभिजीत आपल्या ‘एक्स’ अकाउंटवरून शेतकऱ्यांच्या आंदोलनापासून ते महागाईपर्यंतच्या राजकीय मुद्द्यांवरून केंद्र सरकार आणि पंतप्रधानांना लक्ष्य करत आहे.

# प्रा. डॉ. वसंत बिरादार यांच्या एआय संशोधनाची पेटेंट जर्नलमध्ये नोंद



**अहमदपूर (प्रतिनिधी)** – येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य, ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक व कादंबरीकार डॉ. वसंत माणिकराव बिरादार यांच्या नेतृत्वाखालील संशोधक चमूने विकसित केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणालीची भारत सरकारच्या पेटेंट जर्नलमध्ये अधिकृत नोंद झाली आहे.

‘मशीन लर्निंग-बेस्ड ऑटोमेटेड रायटिंग इव्हॅल्युएशन अँड फीडबॅक सिस्टम फॉर ईएसएल-ईएफएल इन हायर एज्युकेशन’ या शीर्षकाच्या या नाविन्यपूर्ण संशोधनासाठी डॉ. बिरादार यांनी १९ मार्च २०२६ रोजी पेटेंट अर्ज दाखल केला होता. भारत सरकारच्या पेटेंट कार्यालयाने दि. २९ मे २०२६ रोजीच्या ‘पेटेंट जर्नल’ अंक क्र. २२-२०२६ मध्ये सदर अर्ज प्रकाशित केला आहे.

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार व त्यांच्या ११ सहसंशोधकांनी विकसित केलेली ही प्रणाली उच्च शिक्षणातील इंग्रजी विद्यार्थ्यांचे लेखन तपासते. ट्रान्सफॉर्मर-आधारित डीप लर्निंग मॉडेल्स आणि नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंगच्या मदतीने ही प्रणाली केवळ शाब्दिक चुका न दाखवता निबंधाची सुसंगती, युक्तिवादाची मांडणी आणि भाषिक गुंतागुंत यांचे विश्लेषण करून समग्र गुणांकन व निदानात्मक फीडबॅक देते. पेटेंट जर्नलमध्ये अर्ज प्रकाशित होणे ही पेटेंट मिळण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाची पायरी आहे. यानंतर पेटेंट कार्यालयाकडून तांत्रिक तपासणी होऊन ‘पेटेंट ग्रँट’ झाल्यास, या संशोधनाला पुढील २० वर्षांसाठी कायदेशीर संरक्षण मिळेल. या काळात डॉ. बिरादार यांच्या चमूच्या परवानगीशिवाय इतर कोणीही या तंत्रज्ञानाचा व्यावसायिक वापर करू शकणार नाही.

मुख्य संशोधक डॉ. वसंत बिरादार यांच्यासह डॉ. इप्सिता नायक, डॉ. काकासाहेब धोंडीबा धायगुडे, डॉ. मेरी बिनू टी.डी., डॉ. सी. दामोधरन, डॉ. राजा एस, डॉ. एस. भारती, डॉ. एम. विनोथकुमार, प्रा. भूपेंद्र कुमार पटेल, डॉ. रामकुमार वाहलिंगम, आर. भवानी आणि डॉ. जे. आझाद मोहम्मद यांचा या चमूत समावेश आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी. टी. शिंदे, उपाध्यक्ष माधवराव पाटील, सहसचिव हिरागिर गिरी, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, ज्येष्ठ संचालक डी.आर. झोडगे गुरूजी, रामराम एकंबे, काकासाहेब पाटील, भीमराव पाटील यांच्यासह अहमदपूर शहरातील शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी डॉ. बिरादार यांचे अभिनंदन केले आहे.

# मुंबई विमानतळावर ४.१९ कोटींचे सोने जप्त

**मुंबई (प्रतिनिधी)** – छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने सोन्याच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करत दुबईहून आलेल्या दोन प्रवाशांकडून तब्बल ४.१९ कोटी रुपये किमतीचे २.६ किलो सोने जप्त केले आहे. या कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय तस्करीच्या जाळ्याचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला असून, या प्रकरणामागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणांनी मोहीम सुरू केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई सीमाशुल्क विभागाच्या हवाई गुप्तचर पथकाला दुबईहून मोठ्या प्रमाणात सोने तस्करी करून भारतात आणले जाणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी विमानतळाच्या आगमन विभागात सापळा रचून संशयित प्रवाशांवर नजर ठेवली. दुबईहून मुंबईत दाखल झाल्यानंतर संकेत गडावे (कोल्हापूर) आणि प्रतीक जाधव (सांगली) हे दोघे ‘ग्रीन चॅनेल’मधून बाहेर पडण्याच्या तयारीत असताना सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतले. सुरुवातीला दोघांनीही आपल्याकडे कोणतीही संशयास्पद वस्तू नसल्याचा दावा केला. मात्र अधिकाऱ्यांच्या कसून चौकशीनंतर आणि वैयक्तिक झडतीदरम्यान धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

सीमाशुल्क कायदा १९६२ अंतर्गत घेण्यात आलेल्या झडतीमध्ये दोन्ही प्रवाशांच्या कपड्यांमध्ये काळ्या रंगाच्या पिशव्या लपवून ठेवण्यात आल्याचे आढळले. या पिशव्यांमध्ये मेणाच्या स्वरूपात सोन्याची धूळ लपविण्यात आली होती. तपासानंतर या सोन्याचे एकूण वजन सुमारे २.६ किलो असल्याचे निष्पन्न झाले. प्राथमिक चौकशीत आरोपींनी दुबईतील एका व्यक्तीकडून हे सोने स्वीकारल्याची कबुली दिली आहे. सीमाशुल्क विभागाची दिशाभूल करून हे सोने भारतात आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हे सोने कायदेशीर मार्गाने आयात करण्यात आले असते तर सरकारला सुमारे १.४६ कोटी रुपयांचा महसूल मिळाला असता.


### जाहीर प्रगटन

मौजे पाताळगंगा ता. कंधार जि. नांदेड येथील गट क्रं. १२, ५२६, ५२९, ५६७, ५७१, ५७२, ५७४, ५८१ व ५८९ मधील जमिनीबाबत सर्वसामान्य जनतेस व संभाव्य खरेदीदारांना ही जाहीर सूचना देण्यात येत आहे.

मी, सौ. सखुबाई जेजेराव घुमे रा. पाताळगंगा ता. कंधार जि. नांदेड असे जाहीर करते की, माझे पती के. जेजेराव हारीदास घुमे यांचे दि.०९/०४/२०२६ रोजी निधन झाले आहे. सदर जमीन माझे सासरे श्री. हरीदास सटवा घुमे यांच्या नावावर असुन माझे पती हे त्यांचे एकमेव पुत्र होते. माझ्या पतीच्या पश्चात मी व माझा अल्पवयीन मुलगा हे त्यांचे कायदेशीर वारसांपैकी आहोत. सदर मालमत्तेबाबत आमचे कायदेशीर हक्क व हितसंबंध निर्माण झालेले आहेत. असे असताना, आमची संमत्ती किंवा कायदेशीर वारसांची प्रक्रिया पूर्ण न करता सदर जमिनीचा व्यवहार, विक्री, खरेदी, गहाण, हस्तांतरण किंवा अन्य कोणताही व्यवहार करण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाली आहे. म्हणून या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, वरील गट क्रमांकातील जमिनीबाबत कोणताही व्यवहार करण्यापूर्वी संबंधित महसुल अभिलेख, वारसा नोंद व इतर कायदेशीर कागदपत्रांची पडताळणी करावी. अन्यथा भविष्यात उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदेशीर वाद, दावा, हरकत किंवा नुकसानीस संबंधित व्यवहार करणारी व्यक्ती स्वतः जबाबदार राहील.

हे जाहीर प्रगटन माझे व माझ्या अल्पवयीन मुलाचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच सर्व संभाव्य खरेदीदार, वित्तीय संस्था, बँका व इतर संबंधितांना सूचित करण्यात येते की, सदर गट क्रमांकातील जमिनीबाबत कोणताही खरेदी-विक्री व्यवहार, करारनामा गहाणखत, बक्षीसपत्र, हस्तांतरण किंवा इतर कोणताही व्यवहार माझी सौ. सखुबाई जेजेराव घुमे व माझ्या अल्पवयीन मुलाच्या हिताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कायदेशीर संरक्षकाची लेखी संमती व परवानगी कोणताही व्यवहार हा वादग्रस्त समजला जाईल व अशा व्यवहारास मी सक्षम न्यायालय व संबंधित प्राधिकरणासमोर आव्हान देणार आहे.

त्यामुळे अशा व्यवहारातुन उभ्दवणाऱ्या सर्व कायदेशीर परिणामांस व आर्थिक नुकसानीस संबंधित खरेदीदार, विक्रीता व व्यवहारातील पक्षक जबाबदार रहातील

**जाहीर प्रगटन देणार**
**सौ. सखुबाई जेजेराव घुमे**
**रा. पाताळगंगा ता. कंधार जि. नांदेड**

### जाहीर प्रगटन

मौजे हंगरगा ता. नायगांव खै. येथील सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री अनिल किशनराव सुजलेगांवकर रा. सुजलेगांव ता. नायगांव खै. यांनी या कार्यालयास अर्ज सादर करुन मौजे हंगरगा येथील गट क्र. १७५ क्षेत्र ८.६५ आर पैकी १.८० आर ही जमीन माझे मालकीचे असून ७/१२ चे इतर अधिकारामध्ये सा. कु. गोविंदराव (२७७) अशी नोंद आहे. असे असलेले कुळाचे नांव कमी करुन देण्यात बाबत विनंती अर्ज सादर केलेले आहे.

तसेच याबाबत कुणाचे आक्षेप असल्यास १५ दिवसाचे आत मा. तहसिलदार नायगांव खै. यांच्याकडे सक्षम पुराव्यासह आपला आक्षेप नोंदवावा.

अन्यथा विहीत मुदतीनंतर शासन नियमानुसार इतर अधिकारातील कुळाची नोंद कमी करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद.

**स्वाक्षरीत/-**
**तहसिलदार नायगांव खै.**

### Change In Name

MY OLD NAME IS **MOHAMMED AZEEMUDDIN MOHAMMED JEELANI** WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME **ABDUL AZEEM MOHAMMED JILANI** HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME.

**:: ADDRESS ::**
**1-2-55/2, RAILWAY STATION, MILLAT NAGAR, MUDKHED TQ. MUDKHED, DIST. NANDED - 431806**

### टी.सी. हरवली

माझी शिवम संजय कलंबरकर या नावाची दहावी पासची टी.सी. नांदेड ते छत्रपती संभाजीनगर रेल्वे प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. यशवंतनगर, जिजाऊ चौक, उदगीर रोड, देगलूर ता. देगलूर जि. नांदेड**

### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors/ Proprietors on Mahatransco SRM E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Particular of Works | Tender No. |
|---|---|---|
| 1 | Work of conversion of SSN to DSN & STN to DTN for lines crossing NH, SH, River, roads of 220kV / 132kV at EHV Lines under EHV O&M Division, Nanded. | EE/EHV(O&M)/NND/TS/2026-27/T-6 **(RFx No. 7000040122)** **Tender Amount :** 47,06,491/- |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer (O): Phone No. 08554995141.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Division Nanded**

### Change In Name

My Old Name is **SANGAMWAR SANGEETA GOVINDRAO** which now I am changing as New Name **SANGITA GANESHRAO KOKULWAR.** Henceforth my all Correspon-dence will be done as per my new name. Please consider the same.

**Address - 1-15-462, Near Maroti Temple, Sharda Nagar, Taroda BK, Nanded- 431605. Mob.No.-94221 73151**

### Change In Name


My Old Name is **AHMED** which now I am changing as New Name **AHMED SAYEED NASSER** Henceforth my all Correspon-dence will be done as per my new name. Please consider the same.

CONTACT - AHMED SAYEED NASSER
S/o Sayeed Nasser, C/20, Suryodaya Nagar, taroda Bk., PO: taroda Bk, DIST: Nanded Pin Code : 431605 CONTACT NO. 9890517998

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)** – न्यायप्रिय आणि जनकल्याणकारी राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१ वा जयंती महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अण्णाराव पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार आनंदराव बोंढारकर, ॲड. शिवाजीराव हाके, ओबीसी नेते महेंद्र देमगुंडे, डॉ. प्रा. शारदाताई माने, माजी जिल्हा परिषद सदस्य भगवान हाके, नवनाथ काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



अध्यक्षीय भाषणात ॲड. अण्णाराव पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणे हे देशातील कोणत्याही लोकप्रतिनिधीने केलेले उपकार नसून ती त्यांची जबाबदारी आहे, कारण अहिल्यादेवींचे कार्य केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे. न्याय, लोककल्याण, धर्मकार्य आणि विकासकामांचा त्यांनी घालून दिलेला आदर्श आजही तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांच्या स्मृती जतन करणे आणि त्यांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हे प्रत्येक लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. तसेच शिक्षणाशिवाय कोणतीही सामाजिक क्रांती घडू शकत नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रमुख व्याख्याते बालाजी वरवटे यांनी समान न्याय व कल्याणकारी कार्य या विषयावर मार्गदर्शन करताना अहिल्यादेवींच्या प्रशासनातील दूरदृष्टी, जनहिताची भूमिका आणि सर्वसमावेशक विकासाच्या धोरणांचा आढावा घेतला. अहिल्यादेवींनी धर्म, जात, पंथ यांचा भेद न करता प्रजेला समान न्याय दिला. जनतेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या त्यांच्या कार्यामुळेच आजही त्यांचे नाव आदराने घेतले जाते असे ते म्हणाले.

आ. आनंदराव बोंढारकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आदर्श, पारदर्शक आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचाा आदर्श घालून दिला. त्यांच्या कार्याचा अभ्यास आजच्या लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भास्कर तळणे यांनी प्रास्ताविकातून जयंती महोत्सवामागील भूमिका व उद्दिष्टे स्पष्ट केली. सूत्रसंचालन बालाजी तुप्पेकर यांनी केले तर शिवकुमार देवकत्ते यांनी आभार मानले.

जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष पंढरी जायनुरे, सचिव दीपक तुडमे, गजानन सरोदे, जगदीश उराडे, रुपेश तुडमे, पाराजी देवदे, व्यंकटेश शिरगिरे तसेच समितीच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विविध उपक्रमांनी आ. कल्याणकर यांचा वाढदिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** – आ. बालाजीराव कल्याणकर हे अत्यंत प्रामाणिक व्यक्ती आहेत. त्यांना सतत आपल्या मतदारसंघातील जनतेच्या विकासाची तळमळ असते. ते खऱ्या अर्थाने लोकसेवक आहेत. ईश्वर त्यांना लोककल्याणासाठी उदंड आयुष्य देओ, ही आई तुळजा भवानी आणि मरळकच्या विमलेश्वर चरणी प्रार्थना करतो. मी आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या पाठीशी कायम उभा आहे, अशा शुभेच्छा देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित शेतकरी बांधव, भगिनी, वारकरी यांनाही शुभेच्छा दिल्या. पाणी सिंचनासाठी शेतकऱ्यांनी प्रामाणिक प्रयत्न करावेत. आपल्या मतदार संघाच्या विकासासाठी एकही रुपया कमी पडू देणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

आ. बालाजीराव कल्याणकर, संध्याताई कल्याणकर यांच्यासह आ. आनंदराव पाटील बोंढारकर, जिल्हा प्रमुख गंगाधर बडूरे, किशन कल्याणकर, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, दर्शनसिंग सिद्धू, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम, महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख अपर्णा नेरलकर, मंगेश कदम, श्याम वानखेडे, संतोष भारसावडे, अनिल पाटील बोरगावकर, बाळासाहेब पावडे आदींची यावेळी उपस्थिती होती. युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश शिंदे मरळककर यांच्या नियोजनात आयोजित कीर्तन सोहळ्यात हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांना मार्गदर्शन करताना खोले महाराज म्हणाले की, संतांनी समाजाला सदाचार,




परोपकार, भक्ती आणि मानवतेचा संदेश दिला आहे. संतांच्या शिकवणीचे आचरण केल्यास व्यक्तीचे जीवन सुखी, समाधानी आणि संस्कारित होते. समाजात वाढत असलेल्या विविध समस्यांवर संत विचार हेच प्रभावी औषध असल्याचेही त्यांनी सांगितले.

आ. बालाजी कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले. कीर्तनानंतर नगर भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तन सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनीही यावेळी मनोगतातून शुभेच्छा दिल्या. याच ठिकाणी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रक्तदान शिबीरही उत्साहात पार पडले.

# अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेत १७३९ गुन्हे दाखल, २५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –१ ते ३१ मे २०२६ दरम्यान पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा, मटका, जुगार, अवैध दारू विक्री, अवैध शस्त्र व इतर अवैध व्यवसायांच्या विरोधात मोहीम उघडली होती. या मोहिमेत १७३९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, या प्रकरणी २५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड परिक्षेत्रात राबविण्यात आलेल्या या मोहिमे दरम्यान गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिते अंतर्गत ३२, महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ३५०, महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये ९८८, शस्त्र अधिनियमान्वये ८७, तर इतर अधिनियमाखाली २८२ अशा एकूण १७३९ कारवाया करुन, (२४१२) इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून २५ कोटी १ लाख २६ हजार २३७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड परिक्षेत्रात संपूर्ण जून महिन्यात गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबविण्यात येणार आहे. सदर मोहिमेंतर्गत परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यामध्ये अवैध गुटखा विक्री व वाहतूक तसेच अंमली पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, विक्री व तस्करी याविरुद्ध प्रभावी कारवाई करण्यात येणार आहे. सदर मोहीम ही संपूर्ण जून महिनाभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असून, संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदारांना अवैध व्यवसायांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गुटख्याविरुद्ध करण्यात येणाऱ्या कारवाईसाठी दहा वर्षांपर्यंत तर अंमली पदार्थांविरुद्ध करण्यात येणाऱ्या कारवाईसाठी २० वर्षे एवढ्या कारावासापर्यंतची शिक्षा असल्याने संबंधितांनी अशा व्यवसायांपासून परावृत्त व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.



# खानापूर येथे पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका विद्यालयात जागतिक दूध दिवस साजरा



**देगलूर (प्रतिनिधी)** – जागतिक दूध दिनानिमित्त खानापूर येथील संभाजी पाटील पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका विद्यालयात दि. १ जून रोजी जागतिक दूध दिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी विद्यालयाचे प्रा. डॉ. स्वामी, माचीनवार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना माणसाच्या जीवनात दुधाचे महत्त्व व दुग्धजन्य पदार्थ आणि दुग्ध व्यवसाय याविषयी माहिती सांगितली. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष बालाजीराव इंगळे, उदगीर पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजश्री पाटील व डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास एस. आर. हिमगिरे, शिंदे, इंगळे यांचेसह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना दूध देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



**नांदेड** – आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. विशाल महाराज खोले यांचा कीर्तन सोहळा व आरोग्य शिबीर विमलेश्वर देवस्थान मरळक (बु.) येथे पार पडले. या अभीष्टचिंतन सोहळ्यास आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्यासह सर्व पक्षीय पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवून आमदार कल्याणकर यांना शुभेच्छा दिल्या. **(छाया: नरेंद्र गडप्पा नांदेड)**

# २ दुचाकी, इनोव्हाला धडक देत कार दुकानात घुसली

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील पूर्णा रस्त्यावरून जाणाऱ्या एका कारचालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे इनोव्हा कारसह २ दुचाकीला जोरदार धडक दिली. तसेच इतर वाहनांनाही धडक देत कार रस्त्यालगतच्या एका दुकानात शिरली. ही थरारक घटना ३१ मे च्या रात्री ११:३० वाजता घडली.

शहरातील पूर्णा रस्त्यावरून हुंडाई आयटेन (क्र. एमएच २६ व्ही –११८८) कारचा चालक भरधाव वेगात ३१ मे रोजीच्या रात्री ११.३० वाजता जात होता. अचानक त्याचे कारवरील नियंत्रण सुटल्याने त्याने रस्त्यालगत उभ्या असलेल्या इनोव्हा कार व २ दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यात कार व दुचाकींचे नुकसान झाले. त्यानंतर त्या कारचालकाने ईतर वाहनांनाही





धडक दिली. यानंतर कार रस्त्यालगतच्या एका दुकानात शिरली. सुदैवाने दुकान बंद होते, यामुळे मोठी दुर्घटना टळली. याबाबतची माहिती मिळताच भाग्यनगर पोलीस घटनास्थळी तत्काळ पोहोचले. पोलिसांनी घडलेल्या घटनेचा पंचनामा केला. नुकसानग्रस्त २ दुचाकी व धडक देणारी कार भाग्यनगर पोलीस ठाण्यात ठेवण्यात आली आहे. १ जून रोजी याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात धडक देणाऱ्या कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ॲड. प्रकाश टोम्पे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील ज्येष्ठ विधीज्ञ नांदेड जिल्हा संघाचे माजी अध्यक्ष ॲड. प्रकाश दत्तात्रेय टोम्पे यांचे सोमवारी संध्याकाळी नांदेड येथे अल्पशा आजाराने खाजगी रुग्णालयामध्ये निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. १ जून रोजी रात्री १० वाजता गोवर्धन घाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दिवंगत प्रकाश दत्तात्रेय टोम्पे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून असा परिवार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्यास शिवभक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या ऐतिहासिक स्मृती जपण्यासाठी अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे यंदा दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा ५ व ६ जून रोजी उत्साहात साजरा होणार आहे. देशभरातून पाच ते सात लाख शिवभक्त उपस्थित राहण्याची शक्यता असल्याचे महोत्सव समितीचे सदस्य माधवराव देवसरकर यांनी सोमवार दि. १ जून रोजी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.



ते म्हणाले की, अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे मार्गदर्शक तथा छत्रपती शिवराय आणि राजर्षी शाहू महाराज यांचे वारसदार युवराज छत्रपती संभाजीराजे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा रायगडावर होणार आहे. शिवभक्तांना सर्व आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समितीतर्फे व्यापक नियोजन केले आहे. सोहळ्याची सुरुवात पहाटे रायगडावरील नगारखान्यासमोर भगवा ध्वज उभारून होईल. त्यानंतर मुख्य शिवराज्याभिषेक सोहळा पार पडेल. रणवाद्य, हलगी, घुमके आणि कैताळाच्या गजरात होळीच्या माळावर शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके सादर केली जाणार असल्याचे माधव देवसरकर यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला माधव देवसरकर यांच्यासह डॉ. गजानन माने, सदानंद पुयड, गजानन सोळंके, गणेश काळम, मारोती गवळे, शिवा शिंदे, शंकर पानपट्टे आदी उपस्थित होते.

# आ. कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता व जनजागृती मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता व जनजागृती मोहिमेचा शुभारंभ सोमवार, दि. १ जून रोजी अष्टविनायकनगर येथील अष्टविनायक मंदिर परिसरातून करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधरराव बडुरे, कार्यक्रमाचे संयोजक तथा शहर प्रमुख श्याम कोकाटे, कार्यक्रमाचे संयोजक तथा संघटन प्रमुख मंगेश शिंदे, एकनाथराव कल्याणकर, नगरसेवक योगेश मुंडे, राजू गुंडावार, संतोष मदनवाड, मुन्ना राठोड, प्रताप पावडे, जयराम कदम, जयंत वाकोडकर, गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजीराव शिंदे, संजय कदम, अनंत मान्नीकर, राजू सुगावकर, सुधीर बोडके, मारुती कदम, हेमंत तेलंग, गणेश पांडे, विठ्ठलसिंग गहेरवार यांच्यासह



परिसरातील नागरिक, शिवसैनिक आणि स्वच्छताप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनानंतर आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यात आली. यावेळी आमदारांसह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी प्रत्यक्ष हातात झाडू घेऊन स्वच्छता करत समाजासमोर आदर्श निर्माण केला. प्रास्ताविक करताना कार्यक्रमाचे संयोजक श्याम कोकाटे यांनी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, स्वच्छता ही केवळ प्रशासन किंवा स्वच्छता कर्मचाऱ्यांची जबाबदारी नसून ती प्रत्येक सुजाण नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. स्वच्छ परिसरामुळे आपले आरोग्य चांगले राहते, रोगराईला आळा बसतो आणि शहराच्या सौंदर्यात भर पडते. आपण आपल्या घरासह रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला तर संपूर्ण शहराचा चेहरामोहरा बदलू शकतो. आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही स्वच्छ, सुंदर आणि निरोगी नांदेड घडविण्याचा संकल्प केला असून प्रत्येक नागरिकांनी या लोकचळवळीत सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश घराघरात पोहोचवावा, असे आवाहन केले.

यावेळी आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्वच्छता ही एक दिवसाची मोहीम नसून ती कायमस्वरूपी अंगीकारण्याची सवय आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून स्वच्छतेची सुरुवात केल्यास संपूर्ण शहर स्वच्छ आणि सुंदर होईल. नागरिकांचे आरोग्य, पर्यावरणाचे संवर्धन आणि शहराचा सर्वांगीण विकास यासाठी स्वच्छता अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने स्वच्छतेचा संकल्प करून तो सातत्याने पाळावा, असे आवाहन केले.

तसेच आमदार कल्याणकर यांनी या सामाजिक उपक्रमाचे संयोजक श्याम कोकाटे आणि संयोजक मंगेश शिंदे यांचे विशेष कौतुक करत त्यांच्या सामाजिक बांधीलकीचे अभिनंदन केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com